दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -३४२ गुरूवार दि.२० ऑगस्ट २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-342 Thursday, Dt.20 August 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# उपोषण अंतरवालीतच, पण मुंबईलाही जाणार; मनोज जरांगे पाटलांनी सांगितलं, सरकारला थेट इशारा

प्रतिनिधी @ मुंबई

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे पुन्हा एकदा मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन आक्रमक झाले आहेत. येत्या २९ ऑगस्टपासून ते पुन्हा एकदा उपोषणाला सुरुवात करणार आहेत. दरम्यान, ते उपोषण अंतरवाली सराटीत करणार की मंबईत करणार? असा सवाल उपस्थित केला जात होता. मात्र, अखेर मनोज जरांगे पाटील यांनीच याबाबतची सविस्तर माहिती दिली आहे. उपोषण अंतरवाली सराटीतच होणार असल्याची माहिती मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी दिली आहे. पण प्रश्न जर निकाली निघाला नाही तर उपोषण सुरु असतानाच मुंबईला निघणार असल्याचा थेट इशारा देखील त्यांनी दिला आहे.

फडणवीस आणि शिंदेमुळचं उपोषणाची वेळ आली दरम्यान, यावेळी बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली. त्यांच्यामुळंच उपोषणाची वेळ आली असल्याचा आरोप मनोज जरांगे यांनी केला आहे. तर संजय सिरसाट यांचा आडमुठेपणा शिंदेंना नडणार असून दोघांची मिली भगत असल्याची शंका जरांगेंनी व्यक्त केली आहे. दरम्यान, उपोषण अंतरवाली सराटीत होणार असून, प्रश्न निकाली नाही लागला तर मुंबईत येणार असल्याचा इशारा देखील मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला दिला आहे.




## सिरसाट यांनी प्रमाणपत्र रद्द केल्याचा आरोप

दरम्यान, गेल्या अनेक दिवसांपासून मनोज जरांगे पाटील हे उपोषण मुंबईत करणार की अंतरवाली सराटीत करणार असा प्रश्न उपस्थित केला जात होता. अखेर मनोज जरांगे पाटील यांनीच उपोषण अंतरवाली सराटीत करणार असल्याची माहिती दिली आहे. त्याचबरोबर सरकारला इशारा देखील दिला आहे. उपोषण अंतरवाली सराटीतच होणार असल्याची माहिती खुद्द जरांगे यांनी दिली आहे. येत्या २९ ऑगस्टला मनोज जरांगे पुन्हा आमरण उपोषणला बसणार आहेत. मात्र हे आंदोलन मुंबई होणार की अंतरवाली सराटी याबाबत संभ्रम होता. मात्र आता मराठा समाजाचं आंदोलन अंतरवाली सराटीतच होणार असून प्रश्न निकाली निघाला नाही तर उपोषण सुरु असतानाच मुंबईला जाणार आहे. त्यासाठी परवानगी अर्ज केला असल्याचं जरांगे पाटील यांनी स्पष्ट केलं आहे. दरम्यान देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यामुळेच उपोषणाची वेळ आली आहे. शिंदे यांच्या सांगण्यावरूनच बैठका घेण्यात आल्याचे जरांगे म्हणाले. एकनाथ शिंदे आणि संजय सिरसाट यांची मिलीभगत असून सिरसाट यांनी प्रमाणपत्र रद्द केल्याचा आरोपही जरांगे यांनी केला आहे.

# अल्पवयीन मुलीला पळवून नेऊन अत्याचार, आरोपीला २० वर्षांची सक्तमजुरी

## अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. एस. घोरपडे यांचा महत्त्वपूर्ण निकाल

**या प्रकरणात सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील अँड. मंजूषा दराडे यांची प्रभावी बाजू निर्णायक ठरली..!**

बीड /प्रतिनिधी

बीड तालुक्यातील एका गावातील अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याप्रकरणी आरोपी ज्ञानेश्वर येडे याला बीड येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. एस. घोरपडे यांनी दोषी ठरवत २० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. या निकालामुळे अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या प्रकरणांत कायद्याचा कठोरपणे वापर होत असल्याचे अधोरेखित झाले आहे.

प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, बीड तालुक्यातील एका गावात राहणाऱ्या अल्पवयीन मुलीला आरोपी ज्ञानेश्वर येडे याने बोलेरो वाहनातून फूस लावून लग्नाचे आमिष दाखवत पळवून नेले. त्यानंतर शेतामध्ये तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप होता. पीडिता अल्पवयीन असल्याने तिच्या वडिलांनी नेकनूर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध तक्रार दाखल केली. पीडितेचा जबाब नोंदवल्यानंतर प्रकरणात



अत्याचार व बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यातील कलमे वाढविण्यात आली.या गुन्ह्याचा तपास नेकनूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक अजय पानपाटील यांनी केला. त्यानंतर महिला विशेष पथकाच्या पोलीस उपनिरीक्षक सीमाली कोळी यांनी तपास पूर्ण करून आरोपी ज्ञानेश्वर येडे याच्याविरुद्ध बीड येथील सत्र न्यायालयात भारतीय दंड विधानातील कलम ३६३, ३६६(अ), ३७६(२)(एन) तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यातील कलम ४(२) व ६ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.सदर प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान सरकार पक्षातर्फे एकूण पाच साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. पीडिता अल्पवयीन असल्याचे न्यायालयीन पुराव्यांतून सिद्ध झाले. आरोपीविरुद्ध उपलब्ध ठोस पुरावे तसेच सरकार पक्षातर्फे करण्यात आलेला प्रभावी युक्तिवाद ग्राह्य धरून अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. एस. घोरपडे यांनी आरोपी ज्ञानेश्वर येडे याला दोषी ठरवत २० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा सुनावली.या प्रकरणात सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील ॲड. मंजूषा दराडे यांनी प्रभावी बाजू मांडली. त्यांना सहाय्यक सरकारी वकील ॲड. अमित हसेगावकर यांनी सहकार्य केले. तर न्यायालयीन कामकाजासाठी महिला पोलीस शिपाई सिंगल मॅडम, आर. बी. सानप आणि ए. बी. बर्डे यांनी पैरवी अधिकारी म्हणून काम पाहिले.



# श्री व्यंकटेश पब्लिक स्कूलचे गणित ऑलिम्पियाडमध्ये घवघवीत यश

बीड प्रतिनिधी

बीड येथील श्री व्यंकटेश पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी गणित ऑलिम्पियाड परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करत शाळेचे नाव उज्ज्वल केले. विद्यार्थ्यांनी उत्तम गुण मिळवत गणित विषयातील आपले प्राविण्य सिद्ध केले असून त्यांच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

यावेळी संस्थेचे सर्वेसर्वा श्री बप्पासाहेब जाधव पाटील, अध्यक्ष श्री किरण पाटील, कोषाध्यक्ष राजेश पाटील, लायन्स क्लबचे माजी अध्यक्ष सुरेश तेंदुलकर, नगरसेवक ड. नागेश तांबारे, माजी नगरसेवक सुहास पाटील, कॉलेजचे प्राचार्य आर. एम. हावळे व मुख्याध्यापक एस. एस. धुमाळ आदी उपस्थित होते.

संस्थेचे सर्वेसर्वा श्री बप्पासाहेब जाधव पाटील यांनी यशस्वी विद्यार्थी, पालक व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी मेहनत व शिस्तीने मिळविलेले हे यश कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

यशस्वी विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने गौरव करण्यात आला. पालकांनीही विद्यार्थ्यांच्या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त केले. श्री व्यंकटेश पब्लिक स्कूलने शैक्षणिक क्षेत्रातील सातत्यपूर्ण कामगिरीमुळे बीड जिल्ह्यात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

# जिओ-बीपी पेट्रोल पंपावर ग्राहकांसाठी आकर्षक ऑफर, इंधन खरेदीवर थेट सवलत

## ३१ ऑगस्टपर्यंत 'फ्युएल फायदा' योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

अंबड प्रतिनिधी

अंबड शहरातील तिरुपती पेट्रोलियम जिओ-बीपी पेट्रोल पंपावर ग्राहकांसाठी मर्यादित कालावधीकरिता 'फ्युएल फायदा' ही विशेष ऑफर सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत पेट्रोल खरेदीवर ग्राहकांना थेट सवलत मिळणार असल्याने वाहनधारकांना इंधन खर्चात बचत करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

ऑफरनुसार ४०० ते १,४९९ रुपयांपर्यंत पेट्रोल खरेदीवर ४ रुपये, १,५०० ते २,४९९ रुपयांच्या खरेदीवर १५ रुपये, तर २,५०० रुपये किंवा त्यापेक्षा अधिक पेट्रोल खरेदीवर ३० रुपयांची थेट सवलत मिळणार आहे. ही ऑफर ३१ ऑगस्टपर्यंत लागू राहणार असून, तत्काळ लॉयल्टी कॅशबॅकची सुविधाही उपलब्ध असल्याचे पंप व्यवस्थापनाने सांगितले.

जिओ-बीपीकडून उपलब्ध होणारे पेट्रोल 'ॲक्टिव्ह' तंत्रज्ञानासह असल्याचे व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले. यामुळे वाहनाची कार्यक्षमता आणि इंधन वापराच्या दृष्टीने ग्राहकांना फायदा होण्याचा दावा करण्यात आला आहे.

ग्राहकांच्या सोयीसाठी तिरुपती पेट्रोलियम येथे नायट्रोजन हवा, थंड पाणी, स्वच्छतागृह तसेच २४ तास सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. दर्जेदार इंधनासोबत विविध सुविधा आणि बचतीची संधी ग्राहकांना एकाच ठिकाणी मिळावी, यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे व्यवस्थापक अशोक गाढे यांनी सांगितले.

अंबड शहर व परिसरातील वाहनधारकांनी ३१ ऑगस्टपर्यंत 'फ्युएल फायदा' ऑफरचा लाभ घ्यावा, असे आवाहन व्यवस्थापक अशोक गाढे यांनी केले आहे.

# श्री क्षेत्र कपिलधार येथे हर्षदाताई शिरसाट मन्मथ स्वामींच्या चरणी नतमस्तक



बाजीराव दादा चव्हाण यांच्या वतीने उत्स्फूर्त स्वागत, कपिलधारच्या विकासकामांची केली पाहणी

बीड । प्रतिनिधी

श्री क्षेत्र कपिलधार येथे छत्रपती संभाजीनगरच्या नगरसेविका तथा युवासेना कार्यकारिणी सदस्य हर्षदा ताई शिरसाट यांनी भेट देऊन मन्मथ स्वामी महाराजांच्या समाधीस्थळी नतमस्तक होत दर्शन घेतले. यावेळी युवासेना मराठवाडा निरीक्षक तथा लोकसभा संपर्क प्रमुख बाजीराव दादा चव्हाण यांच्या वतीने उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी हर्षदा ताई शिरसाट यांचे उत्स्फूर्त स्वागत केले.

कपिलधारच्या पावन भूमीत आगमन झाल्यानंतर हर्षदा ताई शिरसाट यांनी मन्मथ स्वामी महाराजांच्या समाधीस्थळी दर्शन घेऊन आशीर्वाद घेतला. यावेळी त्यांनी कपिलधारच्या आध्यात्मिक व ऐतिहासिक महत्त्वाची माहिती जाणून घेतली. तसेच मंदिर परिसरातील विविध विकासकामांची पाहणी करून मंदिराचा इतिहासही समजून घेतला.

यावेळी बीड जिल्ह्यात बाजीराव दादा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या विविध सामाजिक, जनसेवा व संघटनात्मक उपक्रमांचे हर्षदा ताई शिरसाट यांनी कौतुक केले. जनसामान्यांशी जोडून घेत केले जाणारे कार्य तसेच विविध सामाजिक उपक्रम उल्लेखनीय असल्याचे त्यांनी सांगितले.

या सदिच्छा भेटीदरम्यान युवा उद्योजक डॉ. ज्ञानेश्वर जाधव, विलास मस्के, प्रसाद चव्हाण, अभिजीत पवार, ज्योतीराम फरताडे, सचिन गाडे यांच्यासह शिवसैनिक, युवासैनिक, धर्मवीर प्रतिष्ठानचे सहकारी व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री क्षेत्र कपिलधार येथे झालेल्या या सदिच्छा भेटीमुळे तसेच मन्मथ स्वामी महाराजांच्या दर्शनामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.



बीड - माहिती व जनसंपर्क संचालनालय छत्रपती संभाजी नगरचे विभागीय संचालक श्री प्रवीण टाके सर बीड येथे प्रशासकीय कामकाजा निमित्त पहिल्यांदाच आले होते.त्यांचे बीड जिल्ह्याच्या वतीने स्वागत करताना दैनिक समर्थ राजयोग आणि साप्ताहिक शिववाणीचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी. यावेळी उपस्थित विभागीय कार्यालयातील सहाय्यक अधीक्षक प्रवीण भानेगावकर सर आणि बीडचे जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर.






## संपादकीय....

# विदेशी निधीचा खेळ,एफसीआरएची लढाई

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी विदेशी अंशदान (नियमन) सुधारणा विधेयक, २०२६ पुन्हा एकदा मांडण्याची तयारी केली आणि देशभरातील चर्च, स्वयंसेवी संस्था, विरोधी पक्ष आणि आंतरराष्ट्रीय निरीक्षक यांच्यात एकच खळबळ उडाली.

केरळ विधानसभेने या विधेयकाविरोधात ठराव मंजूर केला, कॅथोलिक बिशप्स कॉन्फरन्स ऑफ इंडियाने गृहमंत्र्यांची भेट घेतली, संयुक्त राष्ट्रांच्या तीन विशेष प्रतिनिधींनी चिंता व्यक्त केली आणि एका अमेरिकी काँग्रेस सदस्यानेही यावर भाष्य केले. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने हे भारताचे अंतर्गत विधिविषयक प्रकरण असल्याचे स्पष्टपणे बजावले. या साऱ्या गदारोळाच्या मुळाशी जो कायदा आहे, त्याचा प्रवास समजून घेतल्याशिवाय आजचा वाद नीट कळणार नाही.

एफसीआरएचा जन्मच मुळी संशयास्पद वातावरणात झाला. इंदिरा गांधी यांनी लादलेल्या आणीबाणीच्या काळात, ३१ मार्च १९७६ रोजी हा कायदा अस्तित्वात आला. त्यावेळचे उद्दिष्ट होते, विदेशी शक्तींचा भारताच्या अंतर्गत राजकारणावर, निवडणुकांवर आणि सामाजिक चळवळींवर प्रभाव पडू नये यासाठी विदेशी निधीच्या प्रवाहावर नियंत्रण ठेवणे. गंमत अशी की, हा कायदा आणला काँग्रेसने आणि आज त्याच कायद्याच्या कठोर आवृत्तीवरून भाजपला आणीबाणीच्या मानसिकतेचा आरोप सहन करावा लागतो आहे. १९८४ साली या कायद्यात सुधारणा करून परदेशी निधी स्वीकारणाऱ्या प्रत्येक स्वयंसेवी संस्थेला गृह मंत्रालयाकडे नोंदणी सक्तीची करण्यात आली. पुढे २०१० साली, पुन्हा एकदा काँग्रेसप्रणित संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळात, जुना कायदा रद्द करून नवा आणि अधिक कडक एफसीआरए, २०१० अस्तित्वात आला, जो २०११ पासून लागू झाला.

विदेशी निधीचा दुरुपयोग?

विदेशी निधीचा दुरुपयोग खरोखर होत होता का आणि तो कसा होत होता. स्वातंत्र्योत्तर काळात मध्य प्रदेश सरकारने १९५४ साली न्यायमूर्ती भवानी शंकर निगम यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती, जिचा अहवाल १९५६ साली आला. या निगम समितीने आदिवासी भागांतील धर्मांतर आणि परदेशी मिशनरी निधी यांच्यातील संबंधांवर तपशीलवार भाष्य केले होते आणि शिक्षण, आरोग्यसेवा यांच्या नावाखाली आर्थिक प्रलोभने देऊन धर्मांतर घडवले जात असल्याचा ठपका ठेवला होता. पुढील दशकांत ओदिशा, मध्य प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, झारखंड यांसारख्या आदिवासीबहुल राज्यांनी स्वतंत्र धर्म स्वातंत्र्य कायदे (फ्रीडम ऑफ रिलिजन ॲक्ट्स) आणले, जे बळजबरी किंवा प्रलोभनाने केल्या जाणाऱ्या धर्मांतरावर नियंत्रण ठेवण्यासाठी होते. १९९८ सालचे गुजरातमधील डांग जिल्ह्यातील ख्रिसमसच्या काळातील हिंसाचार आणि जानेवारी १९९९ मध्ये ओदिशातील मनोहरपूर येथे ऑस्ट्रेलियन मिशनरी ग्रॅहम स्टेन्स आणि त्यांच्या दोन मुलांची जिवंत जाळून करण्यात आलेली हत्या, या दोन्ही घटनांनी धर्मांतर आणि विदेशी निधी हा विषय राष्ट्रीय पातळीवर पुन्हा तापवला. १९७६ पासून आजतागायत तब्बल वीस हजारांहून अधिक संस्थांचे एफसीआरए परवाने रद्द करण्यात आले आहेत,

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर २रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर गेवराई यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांकः ६३२/२०२६**
**आशाबाई विरूध्द - निरंक**
**(मार्फत -ॲड. ए.एस. पंडित )**

ज्याअर्थी मयत नामे गंगुबाई भ्र. बापुराव शेळके हे/या दिनांक ०७.०७.२०२६ रोजी मौजे दैठण ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झालेल्या आहेत.

अर्जदार
१.आशाबाई पि. राधाकिसन शेळके
वय ४६ वर्षे धंदा - शेती रा.दैठण, ता. गेवराई जि. बीड

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घ घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे गंगुबाई भ्र. बापुराव शेळके रा. दैठण ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख : २९.०९.२०२६

**स्वाक्षरित/-**
**क.लिपीक**

**शिक्का**

**आदेशावरून**
**स.अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**क.स्तर,गेवराई**

# शिळ्या पाण्याची गोष्ट!

# थेंब वाचवला थेंब जमवला

पैसा वाचवला म्हणजेच पैसा कमावला अशा आशयाची एक इंग्रजी म्हण आहे. ती सर्वच बाबतीत तंतोतंत जुळते मग ती बचत पैशांचीच असायला पाहिजे असे नाही तर तरी ऊर्जा बचत, इंधन बचत आणि पाण्याबाबतही लागू होते.

आपण जलसंधारणाचा विचार करतो त्यावेळी केवळ पाणी अडविणे आणि पाणी जिरवणे इतकाच मर्यादीत ठेवता कामा नये. पाणी अडविण्यासाठी बांध-बांधणे, धरणे आणि तलाव निर्मिती करणे, पाणलोट क्षेत्र तयार करून पाणी जमिनीत मुरवणे हे सामान्य व्यक्तीचे काम असत नाही. त्यासाठी यंत्रणा, जनसहभाग, यंत्रसामुग्री आदींचा वापर करावा लागतो.

प्रामाणिक पर्यावरणप्रेमी नागरिक या भूमिकेतून आपण ज्यावेळी बघतो त्यावेळी आपल्याला नेमकेपणाने बचत कशी करणे शक्य आहे याची माहिती करून घेणे आवश्यक आहे. ही माहिती जाणून घेतल्यानंतर आपण कशा प्रकारे यात सहभाग देवू शकतो याचा आपल्याला अंदाज येईल आणि ती कृतीत उतरविणे शक्य होईल.

थेंबे थेंबे तळे साचे अशी मराठीत एक म्हण आहे. याचा दुसरा अर्थ पाण्याच्या प्रत्येक थेंबाच मोल जाणून घेऊन त्या प्रत्येकाची बचत म्हणजे आपण कमावलेले पाणी होय.

माझं शेत माझं पाणी म्हणत शेती करताना त्याला लागणाऱ्या आवश्यक पाण्याचीही शेती करण्याची संकल्पणा राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलयुक्त शिवारच्या माध्यमातून समोर आणली आणि त्याला उत्सफूर्त जनप्रतिसाद मिळाला व यातून राज्यात ज्या जिल्ह्यात वर्षातून केवळ एकाच हंगामात शेती शक्य होती त्या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी दोन हंगाम तर काही ठिकाणी बारमाही ३ हंगाम शेती शक्य झाल्याचे चित्र मराठवाडा आणि विदर्भाच्या काही पर्जन्यछाया (अवर्षण प्रवण) असलेल्या जिल्ह्यात बघायला मिळाला.

आता जलसंधारण विभाग आणि कृषी विभागाच्या माध्यमातून जलयुक्त शिवार २.० ची प्रगती याच दिशेने होत आहे. पाऊस एकाच हंगामात पडत असला तरी शेतातील काही भागात शेततळी तयार करून पाणी साठवून दुसऱ्या हंगामात देखील शेती करता येते. काही ठिकाणी तर या शेततळ्यांसाठी असलेल्या जागेतून शेतकरी मत्स्यव्यवसाय देखील करू लागले आणि त्यांच्या शेतीतील उत्पन्नात वाढ आणि अधिक नफा देखील मिळायला लागला.




आपण नागरिक म्हणून काम करू शकतो याचा जर विचार केला तर छतावर पडणारं पाणी जमिनीखाली टाक्यांमध्ये साठवण्याचा एक पर्याय आहे. दुसरा उत्तम पर्याय म्हणजे छतावर पडणारं हे पाणी विहिरी आणि विंधन विहिरी (बोअर) च्या माध्यमातून भूजलात सोडणे हा आहे. यामुळे जमिनीखालील पातळी अर्थात भूजलस्तर झपाट्याने वाढतो हे सिद्ध झाले आहे.

पाण्याचे मोल जाणणे म्हणजे त्यासाठीची प्रक्रिया आपण समजून घ्यावी. आपल्याकडे जे घरात नळाद्वारे पेयजल येते ते शुद्धीकरण संयंत्रात प्रक्रिया करून घरापर्यंत आणले जाते. यात शुद्धीकरण आणि पाईप लाईन्स, पाण्याच्या टाक्या यांचा खर्च असतो. हे प्रक्रिया केलेले शुद्ध पेयजल आपण किती गांभीर्याने वापरतो हे आपण बघावे.

घराबाहेर, प्रवासात आपण हेच पेयजल २० रूपये लिटरने घेतो म्हणजे घरात नळाद्वारे येणाऱ्या पाण्यालाही मोल आहे ते देखील आर्थिक रूपात आहे हे ध्यानात ठेवणे गरजेचे आहे.

सामान्य नागरिक म्हणून पाण्याची बचत करण्याचे छोटे आणि सोपे उपाय सर्वांनी केले पाहिजे. प्रक्रिया करून घरात आलेले शुद्ध पेयजल आपण सकाळी दात घासताना, हात धुताना आणि अनेकदा दाढी करताना वाया घालत असतो. नळाची तोटी पूर्णवेळ खुली ठेवून ते शुद्ध पाणी आपण सांडपाण्यात मिसळतोय याची जाणीव ठेवून पाण्याचा माफक वापर करावा.

घरात पाण्याने अंघोळ करताना शॉवर ऐवजी बादलीचा वापर करणे, घरातील गळके नळ आणि तोटी यांची वेळीच दुरूस्ती करून देखील आपण पाण्याचा वापर मर्यादीत ठेवू शकतो. अनेक जण दुचाकी आणि चार चाकी वाहनाला अक्षरशः अंघोळ घालत वाहन साफ करतात. जे पाणी शुद्ध पेयजल आहे त्याला सांडपाण्यात टाकणे प्रत्येकाने थांबवले पाहिजे.

पाण्याच्या बाबतीत असलेली आणखी एक चुकीची संकल्पना म्हणजे शिळं पाणी घरात एकदा पाणी आपण भांड्यांमध्ये भरून ठेवलं आणि दुसऱ्या दिवशी नळाला पाणी आलं आहे अशा स्थितीत हे पाणी शिळं झालं म्हणत भांड्यामधील पाणी फेकून देत आपण नव्याने भांडी भरून घेणं हा उपक्रम वर्षानुवर्षे करत आलो आहोत.

पाणी कधीही शिळं होत नाही. पाण्याचा केमिकल फॉर्म्यूला करज इतका साधा आहे ते कधी खराब होत नाही किंवा त्याची चव देखील बदलत नाही.

आपण हे लक्षात घेतलं पाहिजे की, पाण्याचा सूर्यप्रकाशाशी संपर्क होत नाही तोवर त्यात कोणताही बदल होत नाही. बाटलीबंद पाणी आपण वापरतो त्यावर एळिू ऊींश असते ते पाणी ज्या प्लास्टिकच्या बाटलीत बंद आहे त्या प्लास्टिकची असते. प्लास्टिकमुळे अशी तारीख टाकण्यात येते. मात्र वर्षानुवर्षे अव्याहत निसर्गतः येणारं पाणी शुद्ध स्थितीत कधीही शिळं होत नाही.

आपण पाणी जाणून घेऊ आणि त्याचा योग्य वापर करून पर्यावरण जपूया चला विचार बदलूया जबाबदार होऊया

शब्दांकन
**प्रशांत दैठणकर**
९८२३१९९४६६



## वासनवाडी येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, ब्लँकेट व फळांचे वाटप

बीड : रेणुका माऊली सेवाभावी संस्था, बीड अंतर्गत जिव्हाळा शहरी बेघर निवारा केंद्राच्या माध्यमातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वासनवाडी येथे विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य वाटप, तसेच ब्लँकेट व फळ वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळावी, तसेच गरजू विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकीतून आवश्यक वस्तू उपलब्ध करून देणे हा होता. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद पाहायला मिळाला.

कार्यक्रमाचे आयोजन राजुभाऊ गुळभीले (पोलीस प्रशासन),

प्रमुख पाहुणे विजयराव जाधवर सर (पोलीस प्रशासन, ट्रॅफिक) व गणेश खोड, सरपंच वासनवाडी यांच्या सहकार्याने करण्यात आले.


यावेळी रेणुका माऊली सेवाभावी संस्थेचे संचालक अभिजीत वैद्य, जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे व्यवस्थापक राजु वंजारे, पोलीस हवालदार गाडे, पोलीस हवालदार कदम, ग्रामस्थ सोमनाथ शिंदे, दामोदर खरसाडे, योगीराज पवार, उत्तम पवार, स्वयंसेवक विनोद इनकर, काळजीवाहक छायाताई सरोदे, यश वंजारे आदी उपस्थित होते.

### जिल्हा रुग्णालयातील धक्कादायक प्रकार

# सिझेरियननंतर पोटात राहिले कापड

बीड, (प्रतिनिधी) : जिल्हा रुग्णालयातील सिझेरियन शस्त्रक्रियेदरम्यान डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे १९ वर्षीय नवविवाहितेच्या पोटात कापड राहिल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या कापडामुळे संसर्ग होऊन आतड्यांना गंभीर इजा झाल्याचे सांगण्यात येत असून, उपचारादरम्यान तिचे गर्भाशय काढावे लागले आहे. सध्या तिची प्रकृती चिंताजनक असून ती पुण्यातील ससून रुग्णालयात उपचार घेत आहे.

वडवणी येथील संध्या सूरज गायकवाड (वय १९) यांना प्रसूतीसाठी १ ऑगस्ट रोजी बीड जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सिझेरियन शस्त्रक्रियेनंतर त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. मात्र, त्यानंतर त्यांना पोटदुखी व तापाचा त्रास सुरू झाला. प्रकृती अधिक खालावल्याने त्यांना पुढील उपचारासाठी पुण्यातील ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले.ससून रुग्णालयातील तपासणीनंतर सिझेरियनच्या वेळी पोटात कापड राहिल्यामुळे संसर्ग होऊन आतड्यांना गंभीर नुकसान झाल्याचे कुटुंबीयांकडून सांगण्यात



आले. त्यानंतर संध्यावर दोन शस्त्रक्रिया करण्यात आल्या. या उपचारादरम्यान आतड्यांचा काही भाग तसेच गर्भाशय काढावे लागल्याचे सांगण्यात आले आहे.

या प्रकरणी संध्याची आई शीला उजगरे यांनी जिल्हा शल्यचिकित्सकांची भेट घेऊन संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते शेषराव जगताप, अमरसिंह मसके यांच्यासह इतर उपस्थित होते. प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती नियुक्त करून अहवालाच्या आधारे पुढील कारवाई केली जाणार असल्याचे समजते.दरम्यान, या गंभीर प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर योग्य ती कारवाई करण्याची मागणी कुटुंबीय व सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात आली आहे.

### जिल्हा रुग्णालयाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

सिझेरियन शस्त्रक्रियेनंतर महिलेच्या पोटात कापड, हातमोजे व कागदी नॅपकीन राहिल्याच्या आरोपाने जिल्हा रुग्णालयाच्या कारभारावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार, शस्त्रक्रियेनंतर संबंधित महिलेला पोटदुखी व इतर त्रास सुरू झाला होता. हा प्रकार ९ ऑगस्ट रोजीच जिल्हा शल्यचिकित्सकांच्या निदर्शनास आणून देण्यात आला होता. असे असताना तातडीने कारवाई का झाली नाही, असा सवाल उपस्थित होत आहे. जिल्हा शल्यचिकित्सकांनी चौकशी समिती स्थापन करून केवळ कागदी कारवाई न करता दोषी डॉक्टरांवर कठोर कारवाई करावी, तसेच संबंधितांविरुद्ध गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी होत आहे.

### नवनियुक्त शिक्षणाधिकारी यांच्या सत्कारानिमित्त

# उर्दू शिक्षकांच्या प्रश्नांवर सकारात्मक चर्चा

बीड : अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेच्या वतीने नवनियुक्त शिक्षणाधिकारी (प्राथमिक) मा. जयश्री चव्हाण मॅडम जिल्हा परिषद बीड यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बीड जिल्ह्यातील उर्दू माध्यमाच्या शिक्षक व शिक्षण क्षेत्राशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्नांवर अत्यंत सकारात्मक व सविस्तर चर्चा करण्यात आली.




विशेषतः नेकनूर अध्यापक विद्यालयातील शिक्षकांची कमतरता, माध्यमिक स्तरावरील उर्दू माध्यमाच्या शिक्षकांच्या समायोजनाचा प्रश्न, तसेच गेवराई येथे सुरू असलेल्या बीड जिल्ह्यातील एकमेव उर्दू ज्युनिअर कॉलेजमधील रिक्त पदांची भरती याबाबत संघटनेच्या वतीने ठोस मागण्या मांडण्यात आल्या.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष काझी मुशाहेद अजीज यांनी उर्दू माध्यमातील शिक्षकांच्या विविध समस्या व प्रलंबित प्रश्न शिक्षणाधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिले. शिक्षकांची उपलब्धता, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळणे, रिक्त पदे भरणे आणि उर्दू माध्यमाच्या शैक्षणिक संस्थांना आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणे या विषयांवर विशेष चर्चा झाली.मा.शिक्षणाधिकारी मॅडम यांनी संघटनेने मांडलेल्या प्रश्नांची सकारात्मक दखल घेत संबंधित विषयांवर आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. त्यामुळे उर्दू शिक्षकांमध्ये आशावादी वातावरण निर्माण झाले आहे.या वेळी उपशिक्षणाधिकारी मा.अंजुम मॅडम, केंद्रप्रमुख सलमा मॅडम, उस्मान खान सर,मोमीन अलीमोद्दीन सर, मोमीन मोहम्मद खैसर सर, मोमीन जावेद सर, मोमीन साजेद एकबाल, शेख अब्दुल्ला तसेच शेख समीर साहेब यांची विशेष उपस्थिती होती. उर्दू माध्यमाच्या शिक्षकांच्या न्याय्य प्रश्नांसाठी संघटना सातत्याने पाठपुरावा करीत असून, प्रशासनाच्या सकारात्मक भूमिकेमुळे या प्रश्नांना लवकरच योग्य तो न्याय मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.उर्दू माध्यमाच्या शिक्षकांच्या प्रश्नांसाठी संघटना सदैव तत्पर असून, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या हितासाठी प्रशासनासोबत सकारात्मक संवादातून प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील, असे संघटनेचे अध्यक्ष काझी मुशाहेद अजीज यांनी यावेळी सांगितले.

**टि सी हरवली आहे**

रामसिंग दत्तूसिंग परदेशी रा.पाथरवाला बुद्रुक ता.अंबड जि.जालना जिल्हा परिषद प्रशाला गोंदी ता.अंबड जि.जालना या नावाची इय्यता १० पास ची टी सी अंबड ते गोंदी प्रवासादरम्यान हरवली आहे कोणास सापडल्यास ९८५०४९९४३८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-११७७ दि.११.०८.२०२६**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **गणेश बाबुलाल पवार, रा.कर्जत ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | सृष्टी गणेश पवार | मुलगी | १३.१०.२०२१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ११/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१२१६ दि.१८.०८.२०२६**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **विकास संतोष राठोड, रा.वडीकाळ्या तांडा, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | सिध्दार्थ विकास राठोड | मुलगा | ०९.११.२०२४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**




# ७० हजाराची लाच घेताना तलाठी जेरबंद!

गेवराई (जिल्हा प्रतिनिधी शेख जावेद सर):-अवैधवाळू उपसासुरुठेवण्यासाठी तब्बल ७० हजाराची लाच स्वीकारताना तलाठी संघटनेचे अध्यक्ष तथा तलाठीविलासमोराळे यालाछत्रपती संभाजीनगर येथील लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे. गेवराईचे तहसीलदार संदीप खोमणेहेअगोदरच वाळूचोरीप्रकरणातसक्तीच्यारजेवरअसतानाआता तलाठीपकडलागेल्याने खळबळउडालीआहे.गेवराई तालुक्यातील गोदाकाठ हा वाळू उपसा करण्यासाठी वाळू माफियांना महसूल प्रशासनाने आंदन दिला आहे. ऑगस्ट २५ ते जून २६ दरम्यान तहसीलदार संदीप खोमणे यांनी शंभर कोटी रुपयांची वाळू उपसा केली होती. या प्रकरणी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या चोकशीत दोषी आढल्याने तलाठी, मंडळ अधिकारी, पोलीस आणि ब्रोकर यांच्यासह तब्बल १९ लोकांवर गुन्हा दाखल झाला होता. यापैकी बहुतांश आरोपीला अद्याप अटक झालेली नाही.अशातच आता ही कारवाई झाल्याने प्रशासनातील खाबुगिरी उघड झाली आहे.

अवैध वाळू वाहतुकीसाठी सहकार्य करण्याच्या बदल्यात मोराळे यांनी संबंधिताकडे लाचेची मागणी केल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर तक्रारीची पडताळणी करून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सापळा रचला. ७० हजार रुपयांची लाच स्वीकारताना मोराळे यांना पथकाने ताब्यात घेतले. ही कारवाई छत्रपती संभाजीनगर पथकातील भास्कर नवले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या प्रकरणी संबंधित तलाठ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# महाआरोग्य शिबिरातील रुग्णांना उपचाराचा आधार; मुख्यमंत्री सहायता निधीतूनही लाखोंची मदत


पाटोदा : प्रतिनिधी

मुख्यमंत्री सहायता निधीतून आमदार सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून आष्टी तालुक्यातील महादेव जाधव (रा. वटणवाडी) यांच्या वैद्यकीय उपचारासाठी ५० हजार रुपये, तर विश्वनाथ गागरे (रा. सुबेवाडी) यांच्या उपचारासाठी ७० हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या आर्थिक मदतीमुळे गरजू रुग्णांना मोठा आधार मिळाला असून, मदतीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अमर वाळके यांनी कागदपत्रांची पूर्तता व आवश्यक पाठपुराव्यात महत्त्वाचे सहकार्य केले.

दरम्यान, मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिरात नोंदणी केलेल्या रुग्णांवर विविध शस्त्रक्रिया योजनेच्या माध्यमातून मोफत करण्यात येत आहेत. डॉ. अभिषेक जाधव यांनी यशवंतराव जाधव मेमोरियल हॉस्पिटल, बीड येथे या शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडल्या.

यामध्ये भास्कर बांगर (रा. भायाळा, ता. पाटोदा) यांच्या पोटाची शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करण्यात आली. रामराव गाडेकर यांची लॅपरोस्स्त्कही मोफत व यशस्वीपणे पार पडली. या रुग्णांना योजनेच्या माध्यमातून उपचार मिळाल्याने त्यांच्या कुटुंबीयांवरील मोठा आर्थिक भार कमी झाला आहे.

याशिवाय उषाबाई रामा पन्हाळकर (रा. दादेगाव परिसर)



यांच्या उपचारासाठीही योग्य ती मदत मिळवून देण्यात यश आले. महाआरोग्य शिबिरातून नोंदणी केलेल्या रुग्णांच्या शस्त्रक्रिया व उपचारासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता, पाठपुरावा आणि समन्वयासाठी आमदार सुरेश आण्णा धस यांचे रुग्ण मदत विभागाचे स्वीय सहाय्यक ड. महेश बेदरे तसेच स्वीय सहाय्यक सोमीनाथ कोल्हे यांनी सातत्याने पाठपुरावा केला.

महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून गरजू रुग्णांना वेळेवर उपचार मिळत असून, विविध शासकीय योजनांचा लाभ घेत रुग्णांचे लाखो रुपये वाचत आहेत. आर्थिक परिस्थितीमुळे उपचारापासून वंचित राहणाऱ्या रुग्णांना या उपक्रमातून मोठा दिलासा मिळत आहे.

# ओबीसी नेत्याच्या आक्षेपार्ह वक्तव्याविरोधात पोलिसांत तक्रार



बदनापूर-(प्रतिनिधी)जालना येथील धर्मवीर छावा संघटना महाराष्ट्र राज्याच्या पदाधिकाऱ्यांनी ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांनी प्रसारमाध्यमांसमोर केलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्याविरोधात पोलिस अधीक्षकांकडे लेखी तक्रार दाखल करून कायदेशीर कारवाईची मागणी करण्यात आली.

संघटनेच्या तक्रारीनुसार, नवनाथ वाघमारे यांनी एका जाहीर मुलाखतीदरम्यान स्वतःला ओबीसी नेता म्हणून संबोधित करताना आक्षेपार्ह, महिलांचा अपमान करणारे तसेच समाजात तेढ व द्वेष निर्माण होईल असे वक्तव्य केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या वक्तव्यामुळे सामाजिक सलोखा बिघडण्याची तसेच महिलांच्या सन्मानाला धक्का पोहोचण्याची शक्यता असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे समाजात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. तसेच महिलांच्या सुरक्षिततेबाबत चुकीचा संदेश जाऊ शकतो, अशी भूमिका तक्रारदारांनी मांडली आहे.

या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित व्यक्तीविरोधात तात्काळ चौकशी करून, वक्तव्यामध्ये कायद्याचे उल्लंघन आढळल्यास कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तक्रारीवर सूर्यप्रकाश मोहनराव जाधव (मराठवाडा अध्यक्ष), लक्ष्मण भुजंगराव गाडेकर (जिल्हा उपाध्यक्ष, जालना) आणि संदीप वसंतराव गाडेकर (समाजसेवक) यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# आधी शेतरस्ते खुले केले आता गरिबांच्या लेकरांच्या शाळा समृद्ध करणार

## जिल्हा परिषद शाळांच्या सक्षमीकरणासाठी सतीश घाटगे यांचा पुढाकार पाथरवाला खुर्दची शाळा घेतली दत्तक

अंबड प्रतिनिधी :- ग्रामीण भागातील कष्टकरी शेतकरी आणि सर्वसामान्य कुटुंबांतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आधार असलेल्या जिल्हा परिषद शाळांच्या सक्षमीकरणासाठी समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील यांनी पुढाकार घेतला आहे. शेतकऱ्यांसाठी शेकडो किलोमीटरचे शेतरस्ते खुले करण्याच्या उपक्रमानंतर आता ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि आधुनिक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी पाथरवाला खुर्द येथील जिल्हा परिषद शाळा दत्तक घेतली आहे.

पाथरवाला खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेत आठवीपर्यंतचे वर्ग असून शाळेच्या विकासासाठी ग्रामस्थांनी लोकसहभागातून विविध स्वरूपाची मदत केली आहे. ग्रामस्थांच्या या प्रयत्नांना बळ देण्यासाठी सतीश घाटगे यांनी शाळेला भेट देऊन उपलब्ध सोयी-सुविधांची पाहणी केली. यावेळी त्यांनी शिक्षक मुख्याध्यापक तसेच विद्यार्थ्यांशी संवाद साधत शाळेच्या अडचणी आणि विद्यार्थ्यांच्या गरजा जाणून घेतल्या.ग्रामस्थांचा लोकसहभाग आणि समृद्धी साखर कारखान्याच्या सहकार्याने शाळेचा सर्वांगीण विकास करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. शाळेला आवश्यक असलेल्या भौतिक सुविधा शैक्षणिक साधने तसेच विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ती मदत करण्याचे आश्वासन सतीश घाटगे यांनी दिले.

हायटेक क्लासरूमपासून आरओ फिल्टरपर्यंत सुविधा

जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनाही शहरातील विद्यार्थ्यांप्रमाणे आधुनिक आणि दर्जेदार शैक्षणिक सुविधा मिळाल्या पाहिजेत अशी भूमिका सतीश घाटगे यांनी यावेळी व्यक्त केली. शाळेत हायटेक क्लासरूम शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी आरओ फिल्टर मुलींसाठी सॅनिटरी नॅपकिनची व्यवस्था, सुसज्ज व स्वच्छतागृह यांसह आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच नवीन शाळा इमारतीच्या बांधकामासाठीही आवश्यक ती मदत करण्याचा शब्द त्यांनी दिला.

ग्रामीण भागातील गरीब व सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बळ देण्यासाठी शाळा सक्षमीकरणाचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. शाळेच्या विकासासाठी पुढाकार घेतल्याबद्दल विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी सतीश घाटगे यांचे आभार मानले.

यावेळी गावचे सरपंच, शालेय समितीचे पदाधिकारी मुख्याध्यापक सर्व शिक्षक विद्यार्थी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवनाथ वाघमारे यांच्या वक्तव्याविरोधात बदनापूर पोलिसांना निवेदन




बदनापूर (प्रतिनिधी) मराठा समाजातील मुलींबाबत नवनाथ वाघमारे यांनी केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याची चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्त्यांनी बदनापूर पोलीस ठाण्यात निवेदन सादर केले.

या निवेदनात संबंधित वक्तव्यामुळे मराठा समाजातील नागरिकांच्या भावना दुखावल्या असून, समाजात असंतोष निर्माण होऊन सामाजिक शांतता व सलोखा बिघडण्याची शक्यता असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे वक्तव्याची तातडीने दखल घेऊन उपलब्ध व्हिडिओ, ऑडिओ तसेच इतर पुराव्यांची पडताळणी करावी आणि कायद्याचे उल्लंघन आढळल्यास संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने प्रशासनाने या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी निवेदनकर्त्यांनी केली.या निवेदनावर सौरभ काळे, गणराज जऱ्हाड, कृष्णा सिरसाट, ऋषिकेश जऱ्हाड, शिवराज जऱ्हाड, अर्जुन ढवळे, महेश ढवळे, प्रथमेश मदन आणि करण काळे यांच्या स्वाक्षरी आहेत.

# देव प्राप्त आहेच, फक्त तो ओळखता आला पाहिजे-ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल

## हाजीपूर येथे अखंड हरिनाम सप्ताहात आध्यात्मिक प्रबोधन

आष्टी – (एस.राजेंद्र लाड) देह हे केवळ रूप असून चैतन्य हेच त्याचे खरे स्वरूप आहे. रूपाचा नाश होतो; मात्र स्वरूपाचा कधीही नाश होत नाही. भगवंत हा प्रत्येकाला आधीपासूनच प्राप्त झालेला आहे. केवळ त्याची ओळख होणे आवश्यक आहे, असे मौलिक प्रतिपादन संत मदन महाराज देवस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल यांनी केले.

आष्टी तालुक्यातील हाजीपूर येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहादरम्यान कीर्तनसेवेच्या माध्यमातून ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल भाविकांना मार्गदर्शन करत होते. त्यांच्या ओघवत्या व प्रबोधनात्मक कीर्तनातून अध्यात्म, भक्ती, मानवी वृत्ती आणि अंतर्मुख जीवनाचा सुंदर संदेश भाविकांसमोर मांडण्यात आला.

कीर्तनातून अध्यात्म आणि मानवी स्वभावावर भाष्य करताना ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल म्हणाले की, गायीचे दूध हे अमृतासमान आहे. मात्र गोचीड आणि दूध यांच्यात अगदी जवळचे अंतर असूनही गोचीडाला दुधाचे मोल कळत नाही. तो दुधाऐवजी रक्ताच्या मागे लागतो. माणसाचेही अनेकदा असेच होते. भगवंत आपल्या अंतरंगात असूनही मनुष्य बाह्य रूप, भौतिक सुख आणि संसारातील आकर्षणांच्या मागे धावत राहतो आणि आपल्या अंतःकरणातील परमात्म्याला विसरतो.

खरी भक्ती आणि निष्ठा असेल, तर भगवंतालाही भक्ताकडे धाव घ्यावी लागते, असे सांगत महाराजांनी संतांच्या



जीवनातील विविध उदाहरणे उपस्थित भाविकांसमोर मांडली. संत सावता माळी, संत जनाबाई, हनुमंतराय आणि बिल्वमंगल यांसारख्या संतांनी भगवंताचा शोध बाह्य जगात न घेता आपल्या हृदयात घेतला. निष्काम भक्ती आणि प्रेमाच्या बळावर भगवंत स्वतः संत सावता माळी, विदुर काका आणि माता शबरी यांच्या भेटीसाठी गेले, असा संतपरंपरेतील दाखला त्यांनी दिला.

मनुष्याने बाह्य दिखाव्यापेक्षा अंतःकरणाची शुद्धता, निःस्वार्थ भक्ती, प्रेम, श्रद्धा आणि सदाचार यांना महत्त्व दिले पाहिजे. भगवंत दूर कुठेतरी नसून आपल्या आचरणात, विचारात आणि अंतःकरणात आहे. त्याला ओळखण्यासाठी अंतर्मुख होणे गरजेचे आहे, असा आध्यात्मिक संदेशही ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल यांनी आपल्या कीर्तनातून दिला.

दरम्यान, हाजीपूर येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाला परिसरातील भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळत असून दररोज मोठ्या संख्येने भाविक कीर्तन व हरिनाम संकीर्तनाचा लाभ घेत आहेत. ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल यांच्या प्रभावी आणि रसाळ कीर्तनामुळे उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.

या प्रसंगी मा. सरपंच विठ्ठल राख, पत्रकार उत्तम बोडखे, पत्रकार समीर शेख, कल्याण वाल्हेकर, चेअरमन पोपट आजबे, बाबासाहेब वाल्हेकर, माऊली महाराज, बाळकृष्ण राऊत यांच्यासह परिसरातील भाविक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'देव बाहेर शोधण्यापेक्षा स्वतःच्या अंतःकरणात शोधा; कारण देव प्राप्त आहेच, फक्त त्याला ओळखता आले पाहिजे,' हा ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल यांच्या कीर्तनातील संदेश भाविकांच्या मनावर ठसा उमटवून गेला.

# आष्टी,पाटोदा,शिरूर मतदारसंघातील प्रश्नांवर माजी आ.भीमराव धोंडे यांची जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा

## सिना प्रकल्पासाठी ४०० क्युसेक पाणी सोडण्याची मागणी;पीकविमा,ग्रामीण रस्ते आणि कुस्ती स्पर्धांबाबतही चर्चा

आष्टी – (एस.राजेंद्र लाड) आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार विधानसभा मतदारसंघातील विविध प्रलंबित प्रश्नांकडे जिल्हा प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी माजी आमदार भीमराव धोंडे यांनी बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. मतदारसंघात अत्यल्प पाऊस झाल्याने शेतकरी संकटात सापडले असून, खरीप पिकांचे संभाव्य नुकसान लक्षात घेता पात्र शेतकऱ्यांना पीकविम्याचा लाभ मिळावा, यासाठी तातडीने आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी धोंडे यांनी केली. यासोबतच कुकडी योजनेअंतर्गत उपलब्ध अतिरिक्त पाणी ४०० क्युसेक क्षमतेने सिना प्रकल्पात सोडण्यात यावे, ग्रामीण भागातील रस्त्यांच्या कामांना गती द्यावी आणि खाशाबा जाधव यांच्या नावाने आयोजित होणाऱ्या कुस्ती स्पर्धांना आवश्यक सहकार्य व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे विविध प्रश्न त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडले.

आष्टी, पाटोदा व शिरूर कासार तालुक्यांमध्ये अपेक्षेप्रमाणे पाऊस न झाल्यामुळे खरीप हंगामातील पिकांवर संकट निर्माण झाले आहे. पावसाअभावी पिकांचे नुकसान होण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक मदतीचा आधार मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे पीकविमा योजनेच्या निकषांनुसार पात्र ठरणाऱ्या शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळण्यासाठी संबंधित विभागाला आवश्यक सूचना देऊन कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केली. शेतकऱ्यांना पीकविम्यापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी प्रशासनाने परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, मतदारसंघातील पाणीप्रश्नावरही बैठकीत महत्त्वपूर्ण चर्चा झाली. कुकडी योजनेअंतर्गत उपलब्ध होणारे अतिरिक्त पाणी ४००




क्युसेक क्षमतेने सिना प्रकल्पात सोडण्यात यावे, अशी मागणी धोंडे यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे केली. सिना प्रकल्पात पाणी उपलब्ध झाल्यास परिसरातील शेतकऱ्यांना त्याचा मोठा फायदा होऊ शकतो. या मागणीची दखल घेत जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी तातडीने दूरध्वनीवरून चर्चा करून पाणी सोडण्यासंदर्भातील प्रश्न मार्गी लावण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली.

मतदारसंघातील ग्रामीण रस्त्यांची दुरवस्था हा देखील यावेळी चर्चेचा महत्त्वाचा विषय ठरला. अनेक गावांना जोडणारे रस्ते नागरिकांच्या दैनंदिन दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाचे असून, खराब रस्त्यांमुळे शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील रस्त्यांची कामे प्राधान्याने हाती घेऊन त्यांच्या विकासाला गती देण्यात यावी, अशी मागणी माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केली. नागरिकांच्या दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या रस्त्यांची पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्ती व विकासकामे करण्याबाबत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, असे त्यांनी सांगितले.


याशिवाय ग्रामीण भागातील क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी खाशाबा जाधव यांच्या नावाने आयोजित करण्यात येणाऱ्या कुस्ती स्पर्धांना व्यापक स्वरूप देण्याबाबतही चर्चा करण्यात आली. ग्रामीण भागात कुस्तीची मोठी परंपरा असून, या क्षेत्रातील नवोदित व गुणवंत मल्लांना योग्य व्यासपीठ मिळावे, यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन मोठ्या प्रमाणावर होणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक सुविधा, मैदान, प्रशासकीय सहकार्य आणि इतर बाबी उपलब्ध करून देण्याची मागणी धोंडे यांनी केली. ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन मिळाल्यास त्यातून राज्य व राष्ट्रीय पातळीवरील गुणवंत खेळाडू घडण्यास मदत होईल, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.

या भेटीदरम्यान आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार विधानसभा मतदारसंघातील शेतकरी, पाणी, पीकविमा, ग्रामीण रस्ते आणि क्रीडा क्षेत्राशी संबंधित विविध प्रश्न जिल्हा प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. संबंधित प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करून नागरिकांना दिलासा देण्याची मागणी माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केली. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी मांडण्यात आलेल्या विविध प्रश्नांबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे मतदारसंघातील प्रलंबित प्रश्नांना प्रशासकीय पातळीवर गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# शहागडजवळ एसटी बस अडवून चालकाला मारहाण

## १० ते १५ जणांविरुद्ध गुन्हा

अंबड प्रतिनिधी :-शहागड बसस्थानकाजवळ एसटी बस अडवून चालकाला शिवीगाळ करत चापट-बुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना मंगळवारी दि.१८ सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी गोंदी पोलिस ठाण्यात तिघांसह




अन्य १० ते १५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.नवनाथ संपतीपन देशमुख वय ५०, एसटी चालक अंबाजोगाई आगार रा. कन्नापूर ता.धारूर जि.बीड हे मंगळवारी कर्तव्यावर होते. त्यांच्या ताब्यातील एमएच २० बीएल १९४४ क्रमांकाची एसटी बस छत्रपती संभाजीनगरकडे जात असताना शहागड बसस्थानकाजवळील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वरील सर्व्हिस रोडवर ही घटना घडली.पोलिसांत दाखल फिर्यादीनुसार प्रकाश येशुदास निकाळजे,अजय प्रकाश निकाळजे व विजय प्रकाश निकाळजे रा.शहागड ता. अंबड यांच्यासह अन्य १० ते १५ जण तेथे आले. प्रकाश निकाळजे याने मोटारसायकल बससमोर आणून बस अडविली. त्यानंतर बस थांबवून चालक देशमुख यांच्याशी तू बस पलीकडून का नाही घेतली या कारणावरून वाद घातल्याचे फिर्यादीत नमूद आहे.यानंतर चालकाला बसमधून खाली बोलावून घेण्यात आले. जमावाने शिवीगाळ करत चापट-बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच एसटी बस अडवून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी नवनाथ देशमुख यांच्या फिर्यादीवरून गोंदी पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक २४४/२०२६ दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहितेच्या कलम १३२, १२१(१), १२६(२), १८९(१), १८९(२), १९० व ३५२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

घटनेचा पुढील तपास गोंदी पोलिसांकडून सुरू असून प्रकरणातील संबंधितांची चौकशी करण्यात येत आहे.

# कांकाडी येथे नागपंचमी उत्साहात साजरी, पंचक्रोशीतील अनेक गावांतील भक्त मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी



नवीन नांदेड –पंचक्रोशीतील अनेक गावात प्रसिद्ध असलेल्या नांदेड तालुक्यातील

कांकाडी गावात नागपंचमी सणा निमित्ताने नागदेव मंदिरात विधीवत पूजन करण्यात आले तर नागपंचमी सणानिमित्त यात्रा भरविण्यात आली होती अनेक गावांतील हजारो भाविक भक्तांनी दर्शन घेऊन यात्रा निमित्ताने आलेल्या अनेक दुकानातून मुर्ती सह अनेक वस्तू खरेदी केली, ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता तर ग्रामपंचायत कार्यालय यांच्या वतीने नाल्या व गावातील प्रमुख रस्त्यांची साफ सफाई व मंदिर परिसरात मुरूम टाकून रस्ता तयार करण्यात आला होता.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी १७ऑगस्ट रोजी नागपंचमी सणानिमित्त कांकाडी गावात नागदेव मंदिरात विधीवत पूजन व गावात यात्रा भरविण्यात आली होती, सकाळपासून पंचक्रोशीतील अनेक गावांतील हजारो भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने दर्शनासाठी गर्दी केली होती.मंदीराचे पुजारी क्रांती किरण मगरे यांनी विधीवत पूजन केले तर गेल्या अनेक वर्षांपासून आनंद मगरे, राहुल मगरे अशोक मगरे,प्रविण मगरे,विनायक मगरे, गणपत हणमंते हे परिवारातील सदस्य हे गेल्या अनेक वर्षांपासून नागपंचमी सणानिमित्त परंपरा जोपासत सामाजिक बांधिलकी जोपासली आहे.

यात्रेसाठी आलेल्या भाविक भक्तांना पिण्याचे पाणी, अल्पोपहार व्यवस्था करुन गावात विविध ठिकाणी शुभेच्छा फलक लावले होते, ग्रामपंचायत कार्यालय कांकाडी यांच्या वतीने चेअरमन तथा मार्गदर्शक हणमंत भवर यांच्या मार्गदर्शनाखाली सरपंच शरद भवर व ग्रामपंचायत सदस्य यांनी नागपंचमी यात्रेनिमित्त प्रमुख रस्त्यास गावातील नाले सफाई करून नागदेव मंदिर कडे जाणाऱ्या रस्त्यावर मुरूम टाकून दबाई करून देण्यात आली होती.यात्रेनिमीत मंदिर परिसरात व गावातील विविध ठिकाणी प्रसाद, मिठाई, मुर्ती दुकानासह अनेक विक्रेत्यांनी खेळणी,सह दुकाने मोठ्या प्रमाणात थाटली होती तर लहान मुलांसाठी आकाश पाळणे व विविध खेळांचे दुकाने आली होती.

ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस अंमलदार, महिला पोलिस, होमगार्ड यांच्या कडेकोट पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. गावातील जेष्ठ नागरिक व विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व व्यंकट कोंके, माजी उपसरपंच, गावातील प्रतिष्ठित नागरीक दशरथ पाटील बागल,शंकर पाटील बागल,यांच्या सह युवक व गावातील नागरिकांनी सहकार्य केले.

# विशेष मतदार पुनर्निरीक्षणाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना

## ४५ दिवसांची विशेष नैमित्तिक रजा व मानधनवाढ द्या

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) विशेष मतदार पुनर्निरीक्षणाचे (एसआयआर) काम करणाऱ्या शिक्षक, शासकीय व निमशासकीय कर्मचारी, तसेच अंगणवाडी सेविका व इतर विभागांतील कर्मचाऱ्यांना ४५ दिवसांची विशेष नैमित्तिक रजा मंजूर करावी आणि त्यांच्या मानधनात वाढ करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांनी महाराष्ट्राचे महसूल मंत्री मा. ना. श्री. चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाच्या वतीने दि. १९ ऑगस्ट २०२६ रोजी हे निवेदन देण्यात आले. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार तसेच महाराष्ट्र राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील विविध स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय व निमशासकीय कार्यालयांतील कर्मचारी विशेष मतदार पुनर्निरीक्षणाचे (एसआयआर) काम करत आहेत.

या प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यात १ मार्च २०२६ ते १५ एप्रिल २०२६ आणि दुसऱ्या टप्प्यात १ जुलै २०२६ ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत संबंधित कर्मचाऱ्यांनी काम केले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही अनेक कर्मचाऱ्यांनी अहोरात्र मेहनत करून विशेष मतदार पुनर्निरीक्षणाचे काम पूर्ण केले असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या कामासाठी राज्यातील जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत क्षेत्रातील शिक्षक, तसेच विविध



शासकीय व निमशासकीय विभागांतील कर्मचारी, अंगणवाडी सेविका आणि इतर विभागांतील कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. नियमित कामकाजासोबत विशेष मतदार पुनर्निरीक्षणाचे अतिरिक्त काम पार पाडताना या कर्मचाऱ्यांवर मोठ्या प्रमाणात कामाचा ताण आला.

त्यामुळे विशेष मतदार पुनर्निरीक्षणाचे (एसआयआर) काम करणाऱ्या सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना ४५ दिवसांची विशेष नैमित्तिक रजा मंजूर करावी, तसेच त्यांनी केलेल्या अतिरिक्त व विशेष स्वरूपाच्या कामाचा विचार करून मानधनात योग्य ती वाढ करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाने केली आहे.

या कर्मचाऱ्यांनी निवडणूक प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचे काम जबाबदारीने पूर्ण केले असल्याने शासनाने त्यांच्या परिश्रमाची दखल घेणे आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे. विशेष रजा आणि मानधनवाढ मिळाल्यास कर्मचाऱ्यांना त्यांच्या अतिरिक्त सेवेबद्दल योग्य सन्मान व दिलासा मिळेल, अशी अपेक्षा संघटनेने व्यक्त केली आहे.

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाचे संस्थापक मा. आ. श्री. संजय केळकर यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनेचे पदाधिकारी विविध प्रश्नांसाठी शासनाकडे पाठपुरावा करत आहेत. या निवेदनावर राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांची स्वाक्षरी असून, विशेष मतदार पुनर्निरीक्षणाच्या कामात सहभागी झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा शासनाने सकारात्मक विचार करावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. विशेष मतदार पुनर्निरीक्षणाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ४५ दिवसांची विशेष रजा व मानधनवाढ मिळावी, या मागणीमुळे आता शासनाच्या निर्णयाकडे शिक्षक व संबंधित कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# प्रवीण देशपांडे यांना 'बेस्ट असिस्टंट गव्हर्नर' पुरस्काराने गौरव

अंबाजोगाई (प्रतिनिधी)


रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ च्या २०२५-२६ या रोटरी वर्षातील भव्य पुरस्कार वितरण सोहळा लातूर येथील साळाई मंडपम येथे उत्साहात पार पडला. या सोहळ्यात रोटरी क्लब ऑफ केजचे संस्थापक सदस्य रो. प्रवीण देशपांडे यांना 'बेस्ट असिस्टंट गव्हर्नर' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने गौरविण्यात आले.




रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२मध्ये मराठवाडा, अहिल्यानगर, सोलापूर आणि सातारा अशा एकूण ११ जिल्ह्यांचा समावेश आहे. अशा विस्तीर्ण कार्यक्षेत्र असलेल्या डिस्ट्रिक्टमध्ये उत्कृष्ट सहाय्यक प्रांतपाल म्हणून मिळालेला हा पुरस्कार प्रवीण देशपांडे यांच्या रोटरीतील दोन दशकांच्या समर्पित सेवा, सातत्यपूर्ण कार्य आणि तपश्चर्येचे फलित मानले जात आहे.

प्रवीण देशपांडे हे रोटरी क्लब ऑफ केजचे संस्थापक सदस्य असून, रोटरीच्या माध्यमातून सामाजिक सेवा, नेतृत्व आणि संघटनात्मक कार्यात त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे. त्यांना मिळालेल्या या पुरस्कारामुळे रोटरी क्लब केजचीही मान उंचावली असून, केजच्या रोटरी परिवारात आनंदाचे वातावरण आहे.प्रचंड मित्रपरिवार, रोटरी सहकारी आणि हितचिंतकांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. सुधीर लातुरे यांच्या अनमोल मार्गदर्शनामुळे आणि सहकार्यामुळेच हा पुरस्कार मिळवता आला, अशी भावना प्रवीण देशपांडे यांनी व्यक्त केली.यावेळी डिस्ट्रिक्ट ३१३२चे पहिले प्रांतपाल जुबीन अमेरिया, डिस्ट्रिक्ट गव्हर्नर इलेक्ट क्षितिज झावरे, २०२५-२६ चे प्रांतपाल सुधीर लातुरे, सौ. संगीता लातुरे आणि सौ. मधुरा झावरे यांच्या हस्ते प्रवीण देशपांडे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

रोटरीच्या माध्यमातून दोन दशकांहून अधिक काळ केलेल्या सेवेला मिळालेली ही पावती असून, 'बेस्ट असिस्टंट गव्हर्नर' हा पुरस्कार म्हणजे केवळ वैयक्तिक सन्मान नसून रोटरी क्लब केजच्या संपूर्ण परिवाराच्या कार्याचा गौरव आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



# वाहन हस्तांतरण प्रक्रिया ठप्प झाली!

अंबाजोगाई - प्रतिनिधी

मागील महिन्यापासून आर टि ओ कार्यालयात वाहन साईड वर काही बदल करण्यात आले.या मध्ये आर सी वरील नाव,पत्ता,मोबाईल नंबर हे आधार कार्डशी जुळून येत नाहीत. या मधील फॉरमॅट सारखे नसल्याने ते जुळून येत नाहीत. या संदर्भात चालक मालक संघटना अंबाजीगाई यांनी यामध्ये दुरुस्ती करून द्यावी किंवा अगोदरचे फॉरमॅट प्रमाणे काम चालू करावे आणि काही वेळ देऊन नंतरच साईड अपडेट करावी अशी मागणीही केलेली आहे.

परंतू बऱ्याच अवधी नंतरही काही कारवाई झालेली नाही यामुळे वाहन हस्तांतरण करणाऱ्या नागरिकांची मोठी पंचाईत झालेली .या शिवाय बोजा चढवणे-मालक बदलणे,बोजा उतरून नवीन मालकाचे नाव लावणे ही कामे या पूर्वी एकाच वेळी केली जात होती पण आता प्रत्येक काम वेग वेगळे करावे लागत असल्याने वाहन मालक,वित्तीय संस्था यांचा वेळ विनाकारण वाढतो आहे हा मुद्दा लक्षात घेऊन यावर लवकरात लवकर मार्ग काढावा अशी चालक मालक संघटनेची मागणी जोर धरू लागली आहे.

# टिपरे महोत्सवात झुंजार क्रीडा मंडळ प्रथम पारितोषिकाचा मानकरी

## आ. विजयसिंह पंडित यांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

गेवराई (प्रतिनिधी) शारदा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित टिपरे महोत्सवात टिपरे स्पर्धा सांघिक मध्ये झुंजार क्रीडा मंडळ संघ प्रथम पारितोषिकाचा मानकरी ठरला. क्रांती क्रिडा मंडळ द्वितीय पारितोषिकाचे मानकरी ठरले तर तृतीय पारितोषिक संभाजीराजे आणि उत्तेजनार्थ अनुक्रमे जगदंबा आणि बाल संघर्ष ग्रुपला प्रदान करण्यात आले. टिपरे महोत्सवाचे आयोजक आ. विजयसिंह पंडित आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत उपस्थितीमध्ये स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कम, स्मृती चिन्ह आणि प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

आ. विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार दिनांक १८ ऑगस्ट रोजी गेवराई शहरातील बाजार तळावर टिपरे महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. अनेक वर्षाची परंपरा लाभलेल्या टिपरी व सोंग कला प्रकाराचा आस्वाद घेण्यासाठी गेवराई शहरातील तसेच परिसरातील महिला मुले आणि नागरिकांनी गर्दी केली होती. स्पर्धेमध्ये ९ संघ सहभागी झाले होते.

टिपरे स्पर्धेत प्रथम झुंजार क्रीडा मंडळला रोख ३३३३३ रुपये, प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह, द्वितीय क्रांती क्रिडा मंडळाला रोख २२२२२ रुपये व स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, तृतीय संभाजीराजे क्रीडा मंडळाला रोख ११११९ रुपये व स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र आणि उत्तेजनार्थ रोख ५५५५ रुपये व स्मृतिचिन्ह अनुक्रमे जगदंबा व बालसंघर्ष ग्रुपला प्रदान करण्यात आले.

उत्कृष्ट पात्र सजावटीमध्ये प्रथम पारितोषिक रोख रुपये ५००० आणि स्मृतिचिन्ह जगदंबा गटाच्या कांतरा या पात्राला मिळाले. द्वितीय पारितोषिक यम या सोंगाला रुपये ३००० रोख व स्मृतीचिन्ह तर तृतीय पारितोषिक रोख रुपये २००० व स्मृतीचिन्ह शिवाजीराव पंडित यांची वेशभूषा केलेल्या अजय मोटे यांना देण्यात आले. उत्कृष्ट पात्र सजावटीमध्ये लक्षवेधी पात्र सजावट मध्ये रोख रुपये १००० व स्मृतिचिन्ह अनुक्रमे गणेश नगरचा कॉक्रोच,



अण्णाभाऊ साठे ग्रुपचा विठ्ठल या पात्रात मिळाले.

उत्कृष्ट उत्कृष्ट सोंग मध्ये प्रथम रोख ५००० व स्मृतीचिन्ह शौर्य नंदकिशोर दाभाडे यांना ५,००० / तर द्वितीय रोख ३००० रुपये व स्मृतीचिन्ह महादेव ( विक्रम जोशी )या कलाकाराला मिळाले. तृतीय रोख २००० रुपये व स्मृतीचिन्ह शिवछत्र ग्रुपच्या हानुमानाची वेशभूषा केलेल्या कलाकाराला मिळाले. उत्तेजनार्थ पारितोषिक रोख १५०० व स्मृतिचिन्ह अनुक्रमे संभाजीराजे ग्रुपच्या ईजिप्तचे राजे या सोंगाला तर विक्रम वेताळ या सोंगाला मिळाले.

उत्कृष्ट वाद्य वादन वैयक्तिक मध्ये प्रथम पारितोषिक रोख ३०००रुपये व स्मृतिचिन्ह शिवछत्र ग्रुपच्या डफडे वाजवणारे कलावंताला मिळाले. द्वितीय पारितोषिक रोख २००० रुपये व स्मृतिचिन्ह जगदंबा ग्रुपला झांज वादनाबद्दल मिळाले. तृतीय पारितोषिक रोख १५०० जगदंबा ग्रुपला प्रदान करण्यात आले. उत्तेजनार्थ अनुक्रमे रोख १००० रुपये व स्मृतिचिन्ह झुंजार आणि क्रांती (डफडे) यांना उत्कृष्ट वादनाबद्दल प्रदान करण्यात आले.यावेळी नागमंत्री या कलाप्रकारातही माटेगावच्या भजनी मंडळाला प्रथम पारितोषिक स्मृतिचिन्ह तर राजपिंप्री भजनी मंडळाला द्वितीय पारितोषिके प्रदान करण्यात आले.

टिपरे महोत्सवाचे आयोजक

आ. विजयसिंह पंडित, उपविभागीय अधिकारी शुभम पवार

नायब तहसीलदार संजय सोनवणे, सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष कालिदास नवले, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीचे अध्यक्ष रवींद्र बोराडे आदी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये सर्व विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आले स्पर्धेचे परीक्षक म्हणून ड. सुभाष निकम, विलास सोनवणे, प्रशांत रुईकर, विष्णूप्रसाद खेत्रे, प्रकाश भुते यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपसभापती श्रीहरी पवार यांनी केले. यावेळी टिपरे महोत्सवाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच महिला व पुरुष नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून विश्वनाथ गागरे व महादेव जाधव यांना १ लाख २० हजारांची मदत मंजूर

मुख्यमंत्री मोफत महाआरोग्य शिबिरानंतरही गरजू रुग्णांच्या उपचारासाठी लोकनेते आ.सुरेश धस यांचा सातत्याने पाठपुरावा

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या पुढाकारातून ५ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या मुख्यमंत्री मोफत महाआरोग्य शिबिराचा लाभ आष्टी मतदारसंघातील असंख्य गरजू रुग्णांना मिळत आहे. या महाआरोग्य शिबिरातून रुग्णांची तपासणी, निदान व उपचाराची सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतरही ज्या रुग्णांना पुढील उपचारासाठी आर्थिक मदतीची आवश्यकता आहे, अशा रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत मिळवून देण्यासाठी आ. सुरेश धस यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

याच अनुषंगाने सुंबेवाडी, ता. आष्टी येथील विश्वनाथ गागरे यांच्या वैद्यकीय उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ७० हजार रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे. गागरे कुटुंबाची आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असल्याने महागड्या वैद्यकीय उपचारांचा खर्च करणे त्यांच्यासाठी मोठे आव्हान होते. अशा परिस्थितीत मंजूर झालेल्या आर्थिक मदतीमुळे गागरे कुटुंबाला उपचारासाठी मोठा आधार मिळाला आहे.



तसेच वटणवाडी, ता. आष्टी येथील महादेव जाधव यांच्या वैद्यकीय उपचारासाठीही मुख्यमंत्री सहाय्यता निधी योजनेतून ५० हजार रुपयांची मदत मंजूर झाली आहे. आर्थिक अडचणीच्या काळात उपचारासाठी मिळालेल्या या मदतीमुळे जाधव कुटुंबालाही मोठा दिलासा मिळाला आहे.

विश्वनाथ गागरे व महादेव जाधव या दोन्ही गरजू रुग्णांसाठी मिळून एकूण १ लाख २० हजार रुपयांची आर्थिक मदत मंजूर झाली आहे. मुख्यमंत्री मोफत महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून आरोग्यसेवेचा लाभ मिळाल्यानंतरही रुग्णांच्या पुढील उपचारांची गरज लक्षात घेऊन त्यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी आ. सुरेश धस यांच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत.

या मदत प्रक्रियेसाठी मदत कक्षातील रुग्णसेवक अमर वाळके, विकास साळवे आणि शरद रेडेकर यांनीही सहकार्य केले.

आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही गरजू रुग्णाचा उपचार थांबू नये, उपचाराअभावी कोणत्याही कुटुंबावर संकट ओढवू नये आणि गरजू रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी लोकनेते आ. सुरेश धस यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. गरजू नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देऊन त्यांच्या उपचाराचा आर्थिक भार काही प्रमाणात हलका करण्यासाठी मदत कक्षाच्या माध्यमातूनही प्रयत्न केले जात आहेत.

मुख्यमंत्री मोफत महाआरोग्य शिबिरातून आरोग्य तपासणी व उपचाराचा आधार, तर त्यानंतर मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून पुढील उपचारासाठी आर्थिक मदत, अशा दुहेरी स्वरूपाच्या या उपक्रमामुळे आष्टी मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे.

रुग्णांच्या अडचणीच्या काळात त्यांच्या पाठीशी उभे राहणे, त्यांना आवश्यक वैद्यकीय उपचार मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे आणि आर्थिक मदतीचा हात देणे, हीच खरी जनसेवा असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे. गरजू रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत यासाठी भविष्यातही अशाच पद्धतीने पाठपुरावा सुरू राहणार असल्याचे सांगण्यात आले.

# मारहाण आणि जातीवाचक शिवीगाळीनंतर तरुणाची आत्महत्या

## चौघांवर अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा

मुलींची छेड काढल्याचा संशय घेत ग्रामपंचायत कार्यालय व शाळेच्या पटांगणात मारहाण केल्याचा आरोप

अंबाजोगाई(प्रतिनिधी)

धानोरा बुद्रुक येथे ग्रामपंचायत कर्मचाऱ्याला मुलींची छेड काढल्याच्या संशयातून मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ केल्याच्या घटनेनंतर २६ वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी मयत तरुणाच्या भावाच्या तक्रारीवरून चौघांविरुद्ध ट्रॉसिटीसह आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मयत किरण रमेश दहिभाते (वय २६, रा. धानोरा बुद्रुक) हा ग्रामपंचायत कार्यालयातील पाणीपुरवठा विभागात काम करत होता. त्याचा भाऊ रवी रमेश दहिभाते यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, अमोल व्यंकटी पांडे, काकासाहेब व्यंकटी पांडे, बप्पासाहेब व्यंकटी पांडे आणि श्रीकांत संपत गोरे (सर्व रा. धानोरा बुद्रुक) यांनी किरणला ग्रामपंचायत कार्यालयात नेऊन मुलींची छेड काढल्याचा संशय घेत लाथाबुक्क्यांनी व बेल्टने मारहाण केली.यानंतर किरणला जिल्हा परिषद शाळेच्या पटांगणात नेऊन दगडाने मारहाण करण्यात आली. यावेळी किरण व त्याचा भाऊ रवी यांना जातीवाचक शिवीगाळ केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या घटनेनंतर झालेल्या मारहाणीमुळे व अपमानामुळे किरण मानसिक तणावात होता. त्यातूनच त्याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणी चारही आरोपींविरुद्ध ट्रॉसिटी कायद्यासह भारतीय न्याय संहितेतील विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपअधीक्षक ऋषिकेश शिंदे (आयपीएस) करीत आहेत.

# पांढरी येथील वांढरेवस्तीवर उद्या ह.भ.प. हरिभाऊ भोंदे महाराजांचे कीर्तन

## श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जन्मोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह;शनिवारी काल्याच्या कीर्तनाने होणार सांगता




आष्टी - (एस. राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील पांढरी येथील वांढरेवस्ती येथे दि. १५ ते २२ ऑगस्ट २०२६ या कालावधीत श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव, श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जन्मोत्सवानिमित्त तसेच हनुमान मूर्ती वर्धापन दिनानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह, नामजप व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील भाविकांच्या सहकार्याने सुरू असलेल्या या धार्मिक सोहळ्याला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

सालाबादप्रमाणे याही वर्षी वांढरेवस्ती, पांढरी परिसरातील भाविक-भक्तांच्या सहकार्याने या भव्य आध्यात्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. ह.भ.प. प्रशांत महाराज भोगाडे आणि ह.भ.प. धोंडीबापू वांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली सप्ताहाचे नियोजन करण्यात आले असून, या सोहळ्याचे व्यासपीठ चालक म्हणून ह.भ.प. प्रशांत महाराज भोगाडे व ह.भ.प. धोंडीबापू वांढरे जबाबदारी सांभाळत आहेत.

सप्ताहाच्या कालावधीत दररोज काकडा, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, नामजप, हरिपाठ, कीर्तन, भाविकांसाठी भोजनाची पंगत तसेच जागर आदी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. परिसरातील भाविक मोठ्या श्रद्धेने नामजपात सहभागी होत असून, संपूर्ण वांढरेवस्ती परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

सप्ताहामध्ये आतापर्यंत नामधारक ह.भ.प. आसाराम महाराज केळसांगवीकर यांचा नामजप कार्यक्रम, ह.भ.प. प्रबोधनकार भाग्यचंद महाराज झांजे (घाटापिंपरी), ह.भ.प. ऋषिकेश महाराज पवार (नाशिक), ह.भ.प. लक्ष्मण महाराज बर्वे (गंगाखेड) तसेच ह.भ.प. परमेश्वर महाराज कल्याणकर (औंढा नागनाथ) यांच्या कीर्तनाचा भाविकांनी लाभ घेतला आहे.

आज गुरुवारी ह.भ.प. श्रीपाद महाराज शिंदे (घोराडेश्वर डोंगर) यांचे कीर्तन होणार असून, उद्या शुक्रवारी ह.भ.प. हरिभाऊ भोंदे महाराज (पिंपळगाव माळवी) यांचे कीर्तन होणार आहे. त्यांच्या कीर्तनाचा लाभ घेण्यासाठी पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

तसेच शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. कैलास महाराज भोरे (देवदैठण भोरदरा) यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे. त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जन्मोत्सवानिमित्त आयोजित या धार्मिक सोहळ्यामुळे पंचक्रोशीतील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. भक्ती, नामस्मरण आणि ज्ञानेश्वरी पारायणाच्या माध्यमातून परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले असून, या सर्व धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचा पंचक्रोशीतील सर्व भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# प्रभाकर नगरमध्ये सिमेंट रस्त्याच्या कामाचा शुभारंभ

## नागरोत्थान योजनेतून रस्त्याला मंजुरी नागरिकांची अनेक वर्षांची मागणी पूर्ण नगरसेवक राजाराम सहाणे यांच्या पाठपुराव्याला यश

भोकरदन इसरारखान पठाण :- शहराच्या विकासकामांना वेग येत असून प्रभाग क्रमांक १० मधील प्रभाकर नगर येथे महाराष्ट्र नागरोत्थान योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या सिमेंट रस्त्याच्या कामाचा शुभारंभ बुधवारी उत्साहात करण्यात आला. माजी जिल्हा परिषद सदस्या आशाताई मुकेश पांडे यांच्या हस्ते या कामाचे उद्घाटन झाले.

प्रभाकर नगर परिसरातील नागरिकांकडून गेल्या अनेक वर्षांपासून सिमेंट रस्त्याची मागणी करण्यात येत होती. नागरिकांची ही मागणी लक्षात घेऊन नगरपरिषदेचे मुख्याधिकारी गजानन तायडे आणि प्रभाग क्रमांक १० चे नगरसेवक राजाराम पाटील सहाणे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळून महाराष्ट्र नागरोत्थान योजनेतून या रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळाली.सिमेंट रस्त्यामुळे प्रभाकर नगर परिसरातील नागरिकांची वाहतूक अधिक सुलभ व सुरक्षित होण्यास मदत होणार आहे. तसेच पावसाळ्यात निर्माण होणारी चिखलाची समस्या दूर होऊन



परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या कामामुळे परिसराच्या विकासालाही चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.उद्घाटनप्रसंगी नगरसेवक दीपक पाटील मोरे, रामदास शेठ पाथरे, रमेश बिरसोने, भूषण भैय्या शर्मा, लताताई सपकाळ, नगरपरिषद अभियंता सिद्धांत चौधरी, गणेश पाटील तळेकर, उदय झाल्टे, नितीन राठोड, कैलास मव्हारे, पुंडलिक सपकाळ, दादाराव सपकाळ, हरिभाऊ ढोणे, सागर पालकर, संजय चौधरी, रणजीत चौधरी यांच्यासह महिला पदाधिकारी सुवर्णा चौधरी, यशोदा भोपळे, सपना राठोड, सरस्वती तळेकर, शिला वाघ, प्रभाकर चौधरी आदी उपस्थित होते.

उद्घाटनानंतर मान्यवरांच्या हस्ते कामाची माहिती देणाऱ्या फलकाचे अनावरण करण्यात आले. या फलकावर कामाची माहिती तसेच संबंधित लोकप्रतिनिधींची नावे नमूद करण्यात आली आहेत.

प्रभागाच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प

प्रभाग क्रमांक १० मध्ये मागील काही महिन्यांपासून रस्ते, नाल्या, पाणीपुरवठा आणि स्वच्छता आदी विविध विकासकामांना गती देण्यात आली आहे. या कामांबद्दल नागरिकांकडून समाधान व्यक्त होत आहे. प्रभागातील प्रत्येक गल्लीचा विकास करण्याचा आपला प्रयत्न असून मुख्याधिकारी तसेच सर्व नगरसेवकांच्या सहकार्याने भोकरदन शहराला आदर्श शहर बनविण्यासाठी प्रयत्नशील राहू अशी ग्वाही नगरसेवक राजाराम सहाणे यांनी दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन नगरसेवक भूषण शर्मा यांनी केले.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाला महत्त्वपूर्ण भारतीय पेटंट

## क्षयरोगावरील कमी पाण्यात विरघळणाऱ्या औषधांच्या नॅनो-ड्रग डिलिव्हरी तंत्रज्ञानाला पेटंटची मान्यता

**नांदेड जिल्हा प्रतिनिधी :- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील औषधनिर्माणशास्त्र संकुलाच्या संशोधन क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची पुन्हा एकदा राष्ट्रीय पातळीवर नोंद झाली आहे. क्षयरोगावरील कमी पाण्यात विरघळणाऱ्या औषधांच्या प्रभावी वितरणासाठी विकसित करण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण नॅनो-स्ट्रक्चर्ड ड्रग डिलिव्हरी तंत्रज्ञानाला भारतीय पेटंट प्राप्त झाले आहे.**



छर्पीीीलीीशव ऊशश्रळींशी ऊर्शीिळलश षी झीश्रू थरींशी-डेर्श्रीलश्रश -पींळ- ढीलशीलींश्ररी र्ओीसी रपव चशींहेव ढहशीशेष या नावाने या संशोधनास पेटंट मंजूर झाले असून, पेटंटचा कालावधी २० वर्षांचा आहे. या संशोधनाचे पेटंटधारक व संशोधक म्हणून डॉ. सुरेंद्र जी. गट्टानी, स्वप्नील पाटील आणि प्रदीप निरभवणे यांची नोंद आहे.

कमी पाण्यात विरघळणाऱ्या क्षयरोगविरोधी औषधांच्या शरीरातील औषध-वितरण प्रक्रियेत सुधारणा घडवून आणण्यासाठी नॅनो-स्ट्रक्चर्ड ड्रग-डिलिव्हरी पद्धतीचा या संशोधनात वापर करण्यात आला आहे. या तंत्रज्ञानामुळे औषधांची प्रभावीपणे शरीरात पोहोच वाढविण्यास तसेच त्यांच्या उपचारात्मक परिणामकारकतेत सुधारणा करण्यास संभाव्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे आधुनिक औषध-वितरण प्रणालीच्या क्षेत्रात हे संशोधन महत्त्वपूर्ण योगदान मानले जात आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.शैलेश वाढेर आणि औषधनिर्माणशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. एस. एस. पेकमवार यांनी डॉ. सुरेंद्र गट्टानी व त्यांच्या सह-संशोधकांचे अभिनंदन केले. त्यांच्या संशोधनातून औषधनिर्माणशास्त्र, नवोपक्रम आणि बौद्धिक संपदा निर्मितीच्या क्षेत्राला चालना मिळणार असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

या पेटंटमुळे औषधनिर्माणशास्त्र संकुलाची संशोधनातील उत्कृष्टता, नवोपक्रम, बौद्धिक संपदा निर्मिती आणि आधुनिक औषध-वितरण तंत्रज्ञानाच्या विकासाप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित झाली आहे. तसेच या यशामुळे विद्यापीठातील शिक्षक व संशोधकांना आरोग्य क्षेत्रातील महत्त्वाच्या समस्यांवर नाविन्यपूर्ण व उपयोजित संशोधन करण्यासाठी निश्चितच प्रेरणा मिळणार आहे.

विद्यापीठाच्या संशोधन परंपरेत भर घालणारे हे पेटंट म्हणजे नांदेडच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्रासाठी अभिमानाची बाब असून, औषधनिर्माणशास्त्रातील विद्यापीठाच्या वाढत्या संशोधन क्षमतेचे हे द्योतक मानले जात आहे.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयाने राबविले हर घर तिरंगा घरघर तिरंगा अभियान व सत्कार समारंभ



केज/ प्रतिनिधी

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज जि.बीड यांनी दि.९ ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत हर घर तिरंगा,घर घर तिरंगा अभियान राबविले.या निमित्ताने ग्रंथालयात ९ ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत नियमीत भारतीय ध्वजाचे ध्वजारोहण केले.सलग ९ दिवस हे अभियान राबविले.तसेच गावातही हरघर तिरंगा, घरघर तिरंगा अभियाना संबंधी जनजागृती करून हरघर तिरंगा,घरघर तिरंगा अभियान राबविण्यास प्रवृत्त केले.यानिमित्ताने देशाभिमान व तिरंग्या प्रती अभिमान, स्वाभीमान जागृत करण्याचे कार्य केले.

याच कालावधीत विविध सांस्कृतीक कार्यक्रमही राबविण्यात आले. ज्यात प्रामुख्याने देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा, देशभक्तांचे चरित्र ग्रंथवाचन,देशभक्तीपर कथाकथन,देशभक्ती पर उत्स्फुर्त भाषण, देशभक्तीपर काव्य वाचन,देशभक्तीपर छोट्यांची छोटी व्याखाने पण देशाभिमान मोठा अशा विविध कार्यक्रमांनी हर घर तिरंगा,घर घर तिरंगा अभियान राबविण्यात आले. याच दरम्यान दिनांक १७ ऑगस्ट २०२६ रोजी ४ थी च्या शिष्यवृत्ती परिक्षेत प्राविण्य मिजविल्या बद्दल ग्रंथालयाचे बाल वाचक चि.अजिंक्य श्रीकृष्ण तट याचा ग्रंथालयात शाल, श्रीफळ,पुष्पहार देवून ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड व जेष्ठ वाचक रामराव तात्या गायकवाड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना अजिंक्य म्हणाला कि, माझ्या यशात ग्रंथालयाचा मोठा वाटा आहे. ग्रंथालयात मी अनेक प्रकारचे बालसाहित्य वाचले तसेच स्पर्धा परिक्षा व सामान्य ज्ञानाचे पुस्तकेही वाचनालयात वाचावयास मिळाली. माझ्या यशात स्वानंद सार्वजनिक वाचनालयाचा मोठा वाटा असल्याचे प्रतिपादन अजिंक्य तट याने सत्काराला उत्तर देताना केले.दिनांक १२ ऑगस्ट २०२६ रोजी प्रा.माणिकराव आनंदगांवकर यांनी ३ कविता संग्रह लिहून प्रकाशित केले म्हणून ग्रंथालयाच्या वतीने त्यांचा शाल,श्रीफळ, पुष्पहार देवून डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड,वाचक व जेष्ठ नागरीक माणीक बप्पागायकवाड,सतीश दादा गायकवाड,श्रीधर गायकवाड,रविंद्र गायकवाड पेंटर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.सत्काराला उत्तर देताना कवि प्रा. माणिकराव आनंदगांवकर म्हणाले कि,माझ्या ८५ वर्षाच्या आयुष्यात असे लोकाभिमुख, समाजाभिमुख, विद्यार्थी प्रिय व संपूर्ण गावाला सामावून घेणारे ग्रंथालय मी दुसरे पाहिले नाही.

ग्रंथालयाच्या ३० वर्षाच्या सातत्यपूर्ण कार्याचे त्यांनी कौतुक केले.सर्व कार्यक्रमाला विद्यार्थी,युवक,वाचक, विद्यार्थिनी,युवती, महिला,पुरुष,जेष्ठ नागरिक,सरपंच, उपसरपंच,ग्रामपंचायत अधिकारी यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ सहभागी झाले होते.

सर्व कार्यक्रमाचे प्रास्ताविक,सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

# स्नेहसंवर्धन पुरस्कारात माणुसकीचा दरवळ -सविता कुरुंदवाडे

## अंबाजोगाई आंतरभारतीचा स्नेहसंवर्धन पुरस्कार प्रदान

आंबाजोगाई (प्रतिनिधी)

आंतरभारती शाखा अंबाजोगाईच्या वतीने दरवर्षी देण्यात येणारा १३ वा स्नेहसंवर्धन पुरस्कार यावर्षी हरीश भाई खिलेशिया यांना प्रदान करण्यात आला. तृप्ती स्वीट होमचे संचालक हरीशभाई खिलोशिया यांना मागील वर्षीचे पुरस्कार प्राप्त प्रा.डॉ. विवेकानंद राजमाने यांच्या हस्ते, आंतरभारतीचे राष्ट्रीय विश्वस्त व मार्गदर्शक अमर हबीब, पुण्याच्या लेखिका सविता कुरुंदवाडे, मनस्वीनी प्रकल्पच्या प्रा. डॉ अरुंधती पाटील यांच्या उपस्थितीत व आंतरभारतीच्या अध्यक्ष प्रो. डॉ. शैलजा बरुरे यांच्या अध्यक्षतेखाली प्रदान करण्यात आला. याप्रसंगी सौ. चेतना हरीश खिलोशिया यांनाही सन्मानित करण्यात आले.

आधार मल्टीस्टेट येथे संपन्न झालेल्या पुरस्कार वितरण समारंभाचे संयोजक व्यंकटेश जोशी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले व या पुरस्कार देण्यामागची भूमिका विषद केली. स्नेहसंवर्धन पुरस्काराचे मानकरी हरीशभाई खिलोशिया यांनी आपल्याला मिळालेला हा पुरस्कार समाजात अन्य प्रांतीयांना सन्मान देणारा आहे असे म्हटले. मागील वर्षाचे स्नेहसंवर्धन पुरस्काराचे मानकरी प्रा. डॉ.विवेकानंद राजमान्य यांनी, 'हा पुरस्कार म्हणजे आपण केलेल्या सामाजिक योगदानाची घेतलेली योग्य दखल



आहे,' असे म्हटले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या व मनस्विनी महिला प्रकल्पाच्या संचालिका प्रा. डॉ.अरुंधती पाटील यांनी अंबाजोगाईच्या जडणघडणीमध्ये अंबाजोगाई येथील सामाजिक व राजकीय क्षेत्रातील पुरोगामी व्यक्ती यांचा महत्त्वाचा वाटा असल्याचे सांगितले. सविता कुरुंदवाडे, (कार्याध्यक्ष आंतरभारती, पुणे) यांनी प्रत्येक भारतीयाने जात, धर्म, प्रांत या पलीकडे जाऊन मानवतावाद जोपासला पाहिजे, मानवता हे मूल्य श्रेष्ठ असल्याचे सांगितले. यासाठी आंतरभारती सारख्या संस्थांची सर्वत्र आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले. ज्येष्ठ पत्रकार व आंतरभारतीचे राष्ट्रीय विश्वस्त अमर हबीब यांनी अंबाजोगाई शहर व एकूणच समाज, राज्य आणि देश पातळीवरील सलोखा, बंधुत्व जोपासण्याबरोबरच जनतेचे प्रश्न सोडविणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांची आवश्यकता सांगितली. नव्या पिढीतील आंदोलने भारतीय व जागतिक लोकशाहीसाठी आशादायी चित्र असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्रा. डॉ. शैलजा बरुरे यांनी भारतीय संविधानातील सर्व प्रकारचे स्वातंत्र्य प्रत्येक नागरिकाला मिळणे आवश्यक असल्याचे सांगितले. मानवनिर्मित, कृत्रिम संकुचित अस्मिता संपविणे हा या पुरस्कारा मागील उद्देश असल्याचे सांगितले.हरीश भाई खिलोशिया यांना देण्यात आलेल्या सन्मानपत्राचे वाचन योगिनी अनिकेत यांनी केले. हरीशभाई खिलोशिया यांचा परिचय अशोक मोदी यांनी करून दिला. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन कवयित्री तिलोत्तमा पतकराव यांनी व आभार प्रदर्शन आंतरभारतीचे सचिव संतोष मोहिते यांनी गुजराती भाषेमध्ये केले. स्नेहसंवर्धन पुरस्कार समारंभाची सुरुवात 'खरा तो एकची धर्म या साने गुरुजी यांच्या गीताने व सांगता राष्ट्रगीताने झाली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व्यंकटेश जोशी, आशा वाघमारे, महावीर भगरे, शरद लंगे, वैजनाथ शेंगुळे, अनिकेत डिघोळकर, दत्ता वालेकर, अच्युत पोतंगले, वैष्णवी राजमाने यांनी परिश्रम घेतले. स्नेहसंवर्धन पुरस्कारासाठी चेतना बेन खिलोशिया, अंबाजोगाई शहराचे नगराध्यक्ष मा. नंदकिशोरजी मुंदडा, प्रा. नानासाहेब गाठाळ, प्राचार्य बी. आय. खडकभावी, डॉ. सुलभा व डॉ. दिलीप खेडगीकर, माजी आमदार पृथ्वीराज साठे, सामाजिक कार्यकर्त्या अनिता कांबळे, ॲड. सुनील सौंदरमल, नगरसेवक बबन भैय्या लोमटे, रचना परदेशी, राजू जांगिड, एड. कल्याणी विर्धे, धनराज सोळंकी, कमलबाई बरुरे, पत्रकार किरण देशमुख, विशाल खिलोशिया व अंबाजोगाई शहरातील विविध संस्था संघटना यांचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

# धरती आबा कर्मचारी दांडी प्रकरण आता महाराष्ट्र विधानमंडळ अनुसूचित जमाती कल्याण समितीकडे

## कार्यवाही करण्यासाठी निवेदनकर्ते आक्रमक

तामसा (प्रतिनिधी )देशांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासात्मक दृष्टिकोनातून क्रांतीसुर्य बिरसा मुंडा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित धरती आबा जनजाती उत्कर्ष अभियान मोहिमे अंतर्गत अंमलबजावणी साठी २५ प्राधान्य क्षेत्र व १७ मंत्रालय निश्चित करण्यात आली होती त्यानुसार जिल्ह्यातील हदगाव तालुक्यातील बारा व हिमायतनगर तालुक्यातील सात गावांचा समावेश करण्यात आला होता परंतु प्रशासनातील उदासीन असणाऱ्या अधिकाऱ्यांनी चक्क या देशव्यापी कार्यक्रमास जाणीव पुर्वक दांडी मारत आदिवासी विकास विभागास खुले आवाहन दिले आहे. या बाबत ऑर्गनायझेशन फॉर राइट्स ऑफ ट्रायबल हिमायतनगर आणि पालक समन्वय समिती हदगाव यांनी संयुक्त पाठपुरावा करून तहसिलदार हदगाव व हिमायतनगर यांनी अनेक शासकीय अधिकारी मुद्दाम अनुपस्थित होते हे ठोस पुराव्यासह सिद्ध केले, पण संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या मागणीनुसार या अनुपस्थित कर्मचाऱ्यावर अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करून त्यांच्या मूळ वेतनातून हाच कार्यक्रम पुन्हा घेण्यात यावा ही मागणी अद्यापही प्रलंबित आहे, या बाबत संघटनेने पंतप्रधान, राष्ट्रपती, राज्याचे मुख्यमंत्री, मुख्य सचिव, आदिवासी विकास विभाग सह संचालक नाशिक, अपर



आयुक्त आदिवासी विकास अमरावती, विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर, आदींना निवेदन पाठवून कार्यवाहीची मागणी करण्यात आली आहे त्यानुसार जिल्हा प्रशासन यांनी तातडीने या निवेदनाची दखल घेत कार्यवाहीचे आदेश काढले पण कार्यवाही कोणी करावी याबद्दल संभ्रम निर्माण झाल्याने कार्यवाही चा चेंडू आता महाराष्ट्र विधानमंडळ अनुसूचित जमाती कल्याण समितीकडे आल्याने कार्यवाहीचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत. या बाबत विधानमंडळ समितीचे अध्यक्ष दौलतराव दरोडा यांनी गंभीर दखल घेत कार्यवाहीचे संकेत दिले आहेत. या बाबत पालक समन्वय समिती हदगाव चे प्रमुख श्री शंकरराव मेंडके, ऑर्गनायझेशन फॉर राइट्स ऑफ ट्रायबल चे संतोष डवरे, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे अंकुश मिराशे यांनी या प्रकरणी गंभीरता समितीकडे मांडली. आजवर जिल्हाधिकारी, प्रकल्प कार्यालय किनवट ,उपविभागीय अधिकारी हदगाव, यांनी तहसिलदार हदगाव आणि हिमायतनगर यांच्या अहवालानुसार कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत फक्त आता प्रत्यक्ष कारवाई कोण करणार हे पाहणे गरजेचे आहे. यावेळी उपस्थित बिरसा मुंडा आंध आदिवासी ट्रायबल डॉक्टर असोशियन चे जिल्हाध्यक्ष डॉ संजय मुरमुरे, सुभाष वानोळे, तुकाराम भुरके, आनंदराव डोखळे, संतोष तायवाडे, मंथन वाळके, गजानन भिसे, प्रविण मेश्राम, शुभम धुर्वे, अभय तलांडे , मुकुंद तमलवाड आदीसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.. हदगाव आणि हिमायतनगर तालुक्यातील शबरी आदिवासी घरकुल योजनेचा लक्षांक वाढवून द्यावा,आदिवासी विकास विभाग यांचा ५ ऑगस्ट २०२६ चा अन्यायकारक शासनदेश रद्द करण्यात करणे, अधिसंख्य झालेल्या पदे तत्काळ भरण्यात यावे, अद्याप जात वैधता प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पदमुक्त करणे, प्रकल्पातील सर्व आश्रम शाळेतील शिक्षकांनी मुख्यालयी राहणे बंधनकारक करण्यात यावे..आदी प्रकारच्या मागण्याचे निवेदन देण्यात आले आहे

चौकट

आजवर या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता जिल्हाधिकारी नांदेड यांनी प्रकल्प कार्यालय किनवट, उपविभागीय अधिकारी हदगाव यांनी तहसीलदार हदगाव व हिमायतनगर, तहसीलदार हदगाव आणि हिमायतनगर यांनी संबंधित विभाग प्रमुख यांच्या नावे अनुपस्थित कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस पाठवली आणि कारवाईचा इशारा दिला तरी पण संबंधित कर्मचाऱ्यांनी त्यास केराची टोपली दाखवल्यामुळे आता विधानमंडळ अनुसूचित जमाती कल्याण समिती कारवाई करणार असल्याची माहिती पालक समन्वय समितीचे अध्यक्ष शंकरराव मेंडके ऑर्गनायझेशन फॉर राइट्स ऑफ ट्रायबल हिमायतनगर चे संतोष डवरे, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे अंकुश भाऊ मिरासे यांनी दिली आहे...

# केज येथे दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर स्थापनेस मंजुरी; राज्य शासनाचा निर्णय

केज/ प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील केज येथे दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) स्थापन करण्यास आणि त्यासाठी आवश्यक पदांना मंजुरी देण्यास राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाने मान्यता दिली आहे. याबाबतचा अधिकृत शासन निर्णय दि.१९ ऑगस्ट २०२६ रोजी जारी करण्यात आला आहे.न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांची संख्या,नवीन न्यायालयासाठी इमारत,न्यायदान कक्ष आणि न्यायाधीशांच्या निवासाची उपलब्धता या बाबींचा विचार करून मुंबई उच्च न्यायालयाच्या नवीन न्यायालय स्थापना समितीने केज येथे वरिष्ठस्तराचे न्यायालय सुरू करण्यास मान्यता दिली होती.त्यानुसार राज्य शासनाने हा निर्णय घेतला आहे.

केज येथील नागरिकांना आणि पक्षकारांना आता वरिष्ठ स्तरावरील दिवाणी दाव्यांसाठी जिल्ह्याच्या ठिकाणी न जाता स्थानिक पातळी वरच न्याय मिळणे सुलभ होणार आहे.

नवीन न्यायालय स्थापनेसोबतच कामकाजासाठी आवश्यक असणारी विविध पदे मंजूर करण्यात आली आहेत.स्थानिक पातळीवर हे न्यायालय सुरू होत असल्यामुळे बीड जिल्हा न्यायालया वरील ताण कमी होईल आणि प्रलंबित प्रकरणांचा निपटारा वेगाने होण्यास मदत होईल.राज्य शासना च्या या निर्णयामुळे केज व परिसरातील वकील वर्ग,पक्षकार आणि




नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.शासनाच्या या निर्णयाचे केज वकील संघाचे अध्यक्ष अँड.एम.एस.लाड यांच्या सह वकील संघाच्या सर्व सदस्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उप मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे,उप मुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, पंकजाताई मुंडे, मा.पालक न्यायाधीश उच्च न्यायालय, मा.जिल्हा न्यायाधीश, मा.जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश,आ. नमीता मुंदडा,अध्यक्ष

बारा कान्सील महाराष्ट्र आणि गोवा यांचे आभार व्यक्त केले आहेत.

बीड जिल्ह्यातील केज येथे दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) स्थापन करण्यास आणि त्यासाठी आवश्यक पदांना मंजुरी देण्यास राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाने मान्यता दिली आहे. याबाबतचा अधिकृत शासन निर्णय दि.१९ ऑगस्ट २०२६ रोजी जारी करण्यात आला आहे.

# चिंचोलीमाळी ग्राम पंचायतच्या वतीने आजी-माजी सैनिकांचा सन्मान सोहळा संपन्न

## माजी सरपंच सुनील बापु देशमुख यांचा स्तुत्य उपक्रम

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील ग्रामपंचायतच्या विद्यमान सरपंच सौ. रोहिणीताई सुनील देशमुख व उपसरपंच सौ.गिता धिरज धनवे व सर्व सदस्य यांच्या वतीने केज तालुक्यातील आजी-माजी सैनिकांचा सन्मान सोहळा दि.१६ आगस्ट

वार रविवार रोजी सकाळी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

याविषयी सविस्तर वृत्त असे की केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील माजी सरपंच सुनील बापु देशमुख यांच्या संकल्पनेतून,देशभक्ती व सैनिकांप्रती असलेल्या आदरभावा तुन मागील चार वर्षां पासून प्रती वर्षी केज तालुक्यातील माजी सैनिकांचा व सध्या कार्यरत असलेल्या आजी सैनिकांचा आदर सन्मान केला जातो त्याचाच एक भाग म्हणून याही वर्षी केज तालुक्यातील उपस्थित सर्व सैनिकांचा सन्मानचिन्ह,शाल, श्रीफळ देऊन यथोचित सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चिंचोली माळीच्या सरपंच सौ. रोहिणी ताई सुनील देशमुख या होत्या तर प्रमुख पाहुण्या म्हणून उपसरपंच सौ.गीता धीरज वनवे,सौ. अनिता जाधव ग्रामविकास अधिकारी, मेजर अजिमोद्दीन शेख तालुका अध्यक्ष माजी सैनिक संघटना केज, श्री.प्रभाकर घोडके सुभेदार मेजर,श्री.एस. आर.मस्के,श्री.नारायण भानुदास शिंदे मा.पं.स सदस्य,श्री.राम मेजर राऊत,श्री.मोहन मारुती नखाते,सीमा पटणे हे होते.तर या कार्यक्रमासाठी उपस्थित सत्कारमूर्ती सर्वश्री मेजर मुरलीधर रामराव नखाते,मोहन बोर्डे,प्रभाकर वडवले, राम गायकवाड,महेबूब शेख,महादेव वाळके, धनराज नखाते, शशिकांत शिंदे,मधुकर बालासाहेब गायकवाड दिनेश



घोडके,महादेव प्रभू नखाते,सुनील बब्रुवान नखाते, चंद्रकांत सिताराम नखाते,राजेंद्र बारगजे, सदाशिव मस्के, शिवाजी अच्युतराव घुले,कैलास घुले, विक्रम घुले,बालाजी चौरे,वैजनाथ आप्पा गालफाडे,श्रीमती प्रमिला हनुमंत गलांडे, सोजरबाई पांडुरंग सुतार,श्रीमंत मोहन नखाते,अर्जुन घोडके, आनंद उद्धव गायकवाड,बाबासाहेब लक्ष्मण घोडके,सुरज मधुकर गलांडे,असीम अजित शेख,अजय महादेव नखाते,बंडू सखाराम राऊत, महादेव गायकवाड, संदिपान इंगळे,अनिल काळे,महादेव दिलीप बजगुडे,ओमकार अंगद बजगुडे,लिंबाजी चाळक,बालासाहेब सोनवणे,श्रीकांत गुळभिले,विलास लक्ष्मण घोडके, शिवाजी इंगळे,राजेंद्र मोरे,आझर शकीरोद्दीन पठाण,तसेच श्रीमती सारुक मॅडम,श्रीमती जाधव मॅडम,श्रीमती मुंडे मॅडम,सौ.कुसुम बब्रुवान काळे,आशा दत्तात्रय बनसोडे या सर्व आजी - माजी सैनिकांसह वीरमाता, विरपत्नी,सैनिकांच्या पित्याचे या सर्वांचा आदरपूर्वक सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राम मेजर राऊत यांनी केले तर सुत्रसंचलन पत्रकार अनिल गलांडे यांनी केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी सरपंच सुनील बापु देशमुख,ग्राम पंचायत सदस्य बाळासाहेब राऊत, रामभाऊ गलांडे, रविकुमार गायकवाड, राजाभाऊ सुतार, रोजगार सेवक अनिल घोडके,व ग्राम पंचायत चे सर्व कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# स्व.विश्वंभर काका कोकिळ यांच्या पुण्यतिथी निमित्त भव्य शालेय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

केज/प्रतिनिधी



जीवन विकास शिक्षण मंडळ,केज संचलित स्वामी विवेकानंद विद्यामंदीर व स्व. प्रमोद महाजन विज्ञान व कला कनिष्ठ महाविद्यालय केज चे भाग्यविधाते तसेच संस्थेचे संस्थापक सचिव स्व.विश्वंभर (काका) कोकिळ यांच्या ९ व्या पुण्यतिथी निमित्त भव्य शालेय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन जीवन विकास शिक्षण मंडळ,केज व कोकिळ परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येत आहे.सदरील स्पर्धा दि. २२ ऑगस्ट २०२६ वार शनिवार रोजी केज येथील स्वामी विवेकानंद विद्यामंदिर (माध्यमिक विभाग) या शाळेमध्ये ठिक १० वाजता सुरू होणार आहे.सदरील स्पर्धा ५ वी ते ७ वी तसेच ८ वी ते १०वी या दोन गटात पार पडणार आहे. पहिला गट इयत्ता ५ वी ते ७ वी- वक्तृत्व स्पर्धेचा विषय कृत्रिम बुद्धिमत्ता- संधी व आव्हाने दुसरा गट इयत्ता ८ वी ते १० वी वक्तृत्व स्पर्धेचा विषय परीक्षा पेपरफुटी- विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ

पारितोषिके-पहिला गट- प्रथम- २१०९ रुपये,द्वितीय- १५०९ रुपये,तृतीय- ११०९ रुपये,उत्तेजनार्थ- ५०९ रुपये.दुसरा गट- प्रथम- ३१०९ रुपये, द्वितीय- २१०९ रुपये, तृतीय- ११०९ रुपये, उत्तेजनार्थ- ५०९ रुपये तसेच सर्व विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र दिले जाणार आहे.या स्पर्धेसाठी लहान गटास ५ मिनिटे व मोठ्या गटात ७ मिनिटे दिले जातील.प्रत्येक वक्तृत्व स्पर्धेमध्ये एक विद्यार्थी वक्ता भाग घेवू शकतो.सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येतील.स्पर्धा संपताच बक्षिस वितरण केले जाईल.सदरील स्पर्धा मराठवाड्यातील सर्व शालेय विद्यार्थ्यांसाठी खुली आहे.तरीआपला उत्स्फूर्त प्रतिसाद हा आमच्या संस्थेच्या उपक्रमाची यशस्विता आहे.म्हणून सदरील स्पर्धेसाठी आपल्या शाळेचे दोन्हीगटासाठी प्रत्येकी एक विद्यार्थी वक्ता पाठवून सहकार्य करावे असे आवाहन जीवन विकास शिक्षण मंडळ केज तसेच कोकिळ परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.स्पर्धकांच्या नोंदणीसाठी संपर्क सत्वधर सर ९४२३१७०५८६,समुद्रे सर ९८२३२१६३७८ सदरील स्पर्धेसाठी स्पर्धकांनी पूर्व नोंदणी करणे आवश्यक आहे.

# पिक विम्याच्या मागणीसाठी शेतकरी कामगार पक्षाचा मोठीवाडी फाटा येथे रस्ता रोको

तर.. मुख्यमंत्र्यांसह मंत्र्यांना, आमदारांना नाकाबंदी करु.. भाई ड नारायण गोले पाटील

गंगामसला:माजलगाव तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग ६१ वर मोठेवाडी फाटा येथे शेतकरी कामगार पक्षाचा पिक विम्याची १७ हजार पाचशे रूपायाची रक्कम त्वरित वाटप करा,सरसगट संपूर्ण कर्जमाफी करा, शेतकऱ्यांना हेक्टरी दोन लाख रुपये नवीन कर्ज द्या, शेतकऱ्यांच्या पशुधनाच्या होणाऱ्या चोरीला आळा घालुन शेतकऱ्यांना एक लाख रूपये मदत करा. या मागणीसाठी १९ ऑगस्ट बुधवार रोजी सकाळी दहा वाजता शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड. नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कार्यकर्त्यांसह रस्ता रोको करण्यात आला यावेळी आंदोलकांनी प्रचंड घोषणाबाजी करत सरकार विरोधात आक्रोश व्यक्त केला, तर भाई ड. नारायण गोले पाटील यांनी शासनाच्या धोरणाचा समाचार घेताना येणाऱ्या काळात शासनाने शेतकऱ्याच्या प्रश्नाला गांभीर्याने न घेतल्यास मुख्यमंत्र्यांसह मंत्रिमंडळ आणि आमदारांना नाकाबंदी करण्याचा इशारा दिला, यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे भाई सलीम खान पठाण,



भाई राहुल सोळंके, भाई अशोक कुलकर्णी, भाई चांगदेव शेजुळ, भाई राम मस्के, भाई विष्णू शेळके, भाई श्रीराम शेवाळे,भाई चंद्रकांत खामकर, अभिषेक सोळंके, दत्ता इंगळे,राजेभाऊ घोडके, गजानन गोंडे, सुदर्शन हिवरकर, अंगद खेत्री, अशोक रासवे,रंजीत जाधव, दत्तात्रय बागल, बाबा औटे, बालासाहेब कटके, अशोक रासवे,तोफीक खान, शेख अनिस, ऋषिकेश सोळंके आदी सहभागी झाले होते. यावेळी वाहनांच्या प्रचंड रांगा लागल्या होत्या तर पोलीस प्रशासनाने प्रचंड संख्येने चोख बंदोबस्त ठेवला होता, शेवटी आंदोलकांनी मागण्याचे निवेदन मंडळ अधिकारी सानप यांना दिले.असता त्यांनी तात्काळ निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना पाठवणार असल्याचे सांगितले.

# सहानुभूती नको अधिकार हवा एकल महिलांचा एल्गार

अंबाजोगाई- प्रतिनिधी

दि १९ ऑगस्ट -मानवलोक संचालित मनस्विनी महिला प्रकल्प आणि महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद यांच्यावतीने आज महाराष्ट्र शासन आणू पहात असलेल्याएकल महिला धोरण यावर अंबाजोगाई येथे चर्चासत्र संपन्न झाले. चर्चा सत्र ची सुरुवात देशाच्या महान विभूती सावित्रीबाई फुले ,फातिमा बेगम आणि पंडिता रमाबाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविकात अरुंधती पाटील यांनी महाराष्ट्र शासनाच्या एकल महिला धोरणाच्या अनुषंगाने हे चर्चासत्र घेण्यात येत आहे असे सांगितले व महाराष्ट्र महिला स्त्री मुक्ती परिषदेने तयार केलेल्या एकल महिला धोरण मसुद्याची माहिती त्यांनी उपस्थितीना दिली. शासन स्तरावरील धोरण तयार करताना गेल्या ३०-३५ वर्षांपासून ज्या महिला कार्यकर्ता आणि संघटना या विषयावर काम करीत आहेत त्यांना विचारात घ्यायला हवे होते अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

चर्चासत्र दोन भागात घेण्यात आले .

पहिले चर्चासत्र यामध्ये अनिता कांबळे, अंकुर प्रतिष्ठान केज यांच्या अध्यक्षते खाली संपन्न झाले यामध्ये साबेरा शेख मीना सोनवणे,




संजीवनी भुरे यांची मांडणी झाली. तर दुसरे सत्र शुभांगी कुलकर्णी, समता प्रतिष्ठान बीड यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले .यामध्ये सुष्मिता हेगडकर, शालू तरमुडे ,आयोध्या टपले यांनी मांडणी केली.

मांडणी करणाऱ्या या सर्व महिलांनी त्यांचे जीवन अनुभव आणि एकल असल्यामुळे येणाऱ्या विविध स्तरावरील अडचणी विस्तृतपणे व्यक्त केल्या. अनिता कांबळे यांनी एच आय व्ही बाधित एकल महिला, सेक्स वर्कर्स यांना येणाऱ्या अडचणी आणि काही मागण्या प्रस्तुत केल्या . न्यायालयात कौटुंबिक हिंसाचार ,पोटगी किंवा संपत्तीधिकार या केसेस लढताना येणाऱ्या अडचणी वकिलाची फी, रोजगार बुडणे तसेच समाजाकडून मिळणारी दुय्यमतेची ,असुरक्षिततेची, फसवणुकीची मिळणारी वागणूक यावर भाष्य केले. शालू तरमुडे यांनी तमासगीर महिलांची होणाते शोषण तसेच त्यांना कोणतेही कागदपत्र तयार करण्यासाठी लागणारा दाखला, आधार कार्ड त्यावर वडिलांचे नाव हवे हा शासनाचा अट्टाहास, यामुळे अनेक योजनांपासून कसे अलिप्त रहावे लागते असे मांडणीत सांगितले.

समारोपाच्या सत्रामध्ये अंबाजोगाई तालुक्याच्या नायब तहसीलदार स्मिता बाहेती यांनी शासनाची भूमिका स्पष्ट केली व संवेदनशीलपणे महिलांची परिस्थिती लक्षात घेऊन त्यांना मदत केली जाईल असेही सांगितले. या सत्रा चा समारोप अनिकेत लोहिया कार्यवाहक मानवलोक यांच्या उपस्थितीत झाला. या सत्राचे अध्यक्ष समारोप शुभंगी कुलकर्णी यांनी बालविवाह हे एकल महिला होण्याचे महत्त्वाचे कारण असून शिक्षणाचा अभाव यामुळे महिलांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागते असे सांगितले.

या चर्चासत्राचे आभार आशा मडके यांनी मांडले सूत्रसंचालन हर्षा पुरी यांनी केले तर बैठक व्यवस्था अंजली कोदारकर सावित्री आणि संजना आपेट यांनी सांभाळली.

या चर्चा १७ मधून शासनाच्या एकल महिला धोरणा ला देण्यासाठी अनेक सूचना समोर आल्या त्या सर्व सूचना तात्काळ शासनाकडे पाठवण्याची जबाबदारी मनस्विनी महिला प्रकल्पाने घेतली आहे.

# विद्यापीठाचा उत्कृष्ट जिल्हा महाविद्यालय म्हणून श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाचा सन्मान

माजलगाव, दि. १९ प्रतिनिधी : भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या येथील श्री सिद्धेश्वर महाविद्यालयास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगरच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागात शैक्षणिक वर्ष २०२५- २६ मध्ये केलेल्या विविध ऍक्टिव्हिटीज व संपन्न केलेल्या विविध कार्यशाळेबद्दल उत्कृष्ट जिल्हा महाविद्यालय म्हणून

श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाचा सन्मान करण्यात आला. महाविद्यालयात झालेल्या विविध कार्यशाळा, शैक्षणिक वर्ष २५-२६ मध्ये महाविद्यालयाने केलेल्या समाजाभिमुख शिक्षण,

कौशल्य विकास, जनजागृती,




सामाजिक बांधिलकी आणि समुदाय विकासाच्या क्षेत्रात केलेल्या विस्तार उपक्रमाचे नियोजन व प्रभावी अंमलबजावणी विद्यार्थी सहभाग व समुदाय सहभाग अशा विविध उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन तसेच महाविद्यातील आजीवन शिक्षण विस्तार विभागाकडून राबविलेले विविध उपक्रमाचे मूल्यांकन करून हा पुरस्कार उत्कृष्ट प्राचार्य प्रो.डॉ. मुकुंद देवर्षी आणि उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी म्हणून प्रा. सुरेश बनसोडे यांचा सन्मान करण्यात आला. हा सन्मान जीएमएनआरडीचे माजी संचालक, अर्थशास्त्रज्ञ प्राचार्य डॉ.सर्जेराव ठोंबरे, प्र. कुलगरु डॉ.प्रवीण वक्ते, कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर, संचालक डॉ.आश्विन रांजणीकर व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.योगिता होके पाटील, डॉ.आनंद वाघ यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी नॅक समन्वयक डॉ.विकस बोरगावकर, लोकप्रशासन शास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुनील पाटील उपस्थित होते. यशाबद्दल भाशिप्र संस्थेचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, सहकार्यवाह अमरनाथ खुर्पे, केंद्रीय कार्यकारणी सदस्य प्रकाश दुगड, मुख्य प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे, सुरेंद्र रेदासणी, अँड. विश्वास जोशी यांनी अभिनंदन केले आहे.

# शालेय बस व शालेय व्हॅन धारकांनी आवश्यक सुधारणा कराव्यात

महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) (पहिली सुधारणा) नियम २०२६ प्रसिद्ध

नांदेड जिल्हा प्रतिनिधी : शासन अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) (पहिली सुधारणा) नियम २०२६ प्रसिद्ध झाली आहे. या अधिसूचनेतील नियम ६- व्यतिरिक्त इतर सर्व बाबी शालेय बस व शालेय व्हॅनशी संबंधित आहेत.

त्यानुसार नांदेड जिल्ह्यातील सर्व शालेय बस व शालेय व्हॅन धारकांनी या सुधारित नियमांनुसार आपल्या शालेय बस, शालेय व्हॅन तसेच संबंधित व्यवस्थापनामध्ये आवश्यक त्या सुधारणा कराव्यात. या सुधारणा १६ जुलै २०२६ पासून तीन महिन्यांच्या आत पूर्ण कराव्यात, अशा सूचना प्रादेशिक परिवहन अधिकारी नांदेड यांनी दिल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व संबंधित शालेय बस व शालेय व्हॅन धारकांनी महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) (पहिली सुधारणा) नियम २०२६ चे पालन करून निर्धारित मुदतीत आवश्यक सुधारणा करून घ्याव्यात.

# श्री साईबाबा मित्र मंडळ कौठा नांदेड यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन

नवीन नांदेड - श्रावण मास निमित्ताने श्री साईबाबा मित्र मंडळ कौठा नांदेड यांच्या वतीने २० ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता साईबाबा मंदिर कौठा नांदेड येथे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.दरवर्षी प्रमाणे याही वर्षी श्रावणमास निमित्ताने श्री साईबाबा मित्र मंडळ यांच्या वतीने श्रावण मास महिन्यातील गुरूवार रोजी दुपारी महाआरती नंतर १२ ते ३ दरम्यान महाप्रसाद आयोजित करण्यात आला असून भाविक भक्तांनी महाप्रसाद लाभ घेण्याचे आवाहन माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद काकडे, माधव गुरूपवार, अशोक दिल्लेराव, रमेश यादव,हेमराज लड्डा,आकाश व साकेत व्यवहारे यांनी केले आहे.

# श्रद्धेला विवेकाची जोड हवी; बुवाबाजीच्या आहारी जाऊ नका

## विज्ञाननिष्ठ अध्यात्मातून सुखी कुटुंब आणि निरोगी समाजाची वाटचाल करण्याचे ज्येष्ठांचे आवाहन

किनवट /प्रतिनिधी :- सनातन हिंदू धर्माच्या परंपरेत विविध पंथ, विचारधारा आणि आध्यात्मिक साधनांचे प्रवाह आहेत. अध्यात्माचा मूलभूत उद्देश हा मानवाला अंतःशांती, संयम, सदाचार आणि समाधानाच्या दिशेने नेणे हा असला पाहिजे. मात्र, श्रद्धेचा गैरफायदा घेत अंधानुकरण, भीती, चमत्कारांचे दावे आणि आर्थिक अथवा मानसिक शोषण करणाऱ्या बुवाबाजीपासून समाजाने सावध राहण्याची गरज आहे, असे मत शहर व परिसरातील ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केले. धर्माचे गूढ ज्ञान मिळविण्याच्या नादात दैनंदिन जीवनातील जबाबदाऱ्या, कुटुंबातील नाती आणि सामाजिक कर्तव्यांकडे दुर्लक्ष होऊ नये. कुटुंब सुखी तर समाज सुखी आणि समाज सुखी तर देश सुखी, या विचारातून अध्यात्माकडे पाहण्याची गरज आहे. त्यासाठी श्रद्धेला विज्ञाननिष्ठ विचार, विवेक आणि चिकित्सक बुद्धीची जोड देणे आवश्यक असल्याचे ज्येष्ठांनी सांगितले. अध्यात्म म्हणजे केवळ पूजा, पाठ, होमहवन, व्रत-वैकल्ये किंवा धार्मिक यात्रा नव्हेत. प्रामाणिकपणा, करुणा, संयम, परोपकार, कर्तव्यनिष्ठा, स्वच्छ आचार-विचार आणि इतरांच्या दुःखात सहभागी होणे हीदेखील अध्यात्माचीच रूपे आहेत. त्यामुळे एखाद्या व्यक्तीने सांगितलेल्या प्रत्येक गोष्टीवर डोळे झाकून विश्वास ठेवण्याऐवजी 'हे का? याचा पुरावा काय? यामुळे कोणाचे भले होणार आहे?' असा प्रश्न विचारण्याची सवय समाजाने लावून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. काही वेळा श्रद्धाळू व्यक्तींना भीती दाखवून किंवा एखाद्या संकटाचे धार्मिक कारण सांगून विशिष्ट पूजा, विधी अथवा उपाय वारंवार करण्यास प्रवृत्त केले जाते. अशा वेळी श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील सीमारेषा ओळखणे महत्त्वाचे आहे. देवावर श्रद्धा असणे ही एक बाब आहे; मात्र त्या श्रद्धेचा वापर करून व्यक्तीला भीतीच्या किंवा अवलंबित्व यांच्या चक्रात अडकविणे ही वेगळी बाब आहे.

दरम्यान, एखादी व्यक्ती पूजा-पाठ किंवा धार्मिक कृती वारंवार करते म्हणूनच तिला मानसिक आजार आहे, असा निष्कर्ष काढणे योग्य नाही. धार्मिक श्रद्धा आणि सांस्कृतिक प्रथा या अनेकांच्या जीवनाचा स्वाभाविक भाग असतात. मात्र एखादी कृती करण्याची अनावर, सततची गरज निर्माण होणे, ती कृती न केल्यास तीव्र भीती किंवा अस्वस्थता जाणवणे, दैनंदिन जीवन, कुटुंब, कामकाज अथवा आर्थिक परिस्थितीवर त्याचा विपरीत परिणाम होणे अशा परिस्थितीत मानसिक आरोग्य तज्ज्ञांचा सल्ला घेणे अधिक योग्य ठरते. अशा समस्यांकडे केवळ 'देवाचा कोप' किंवा 'अध्यात्मिक बाधा' म्हणून पाहणे टाळले पाहिजे. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अर्थ धर्म किंवा अध्यात्म नाकारणे असा नाही. उलट श्रद्धा वैयक्तिक असू शकते; परंतु सार्वजनिक जीवनातील निर्णय विवेक, पुरावा आणि मानवकल्याणाच्या कसोटीवर घेतले गेले पाहिजेत, ही विज्ञाननिष्ठ भूमिका आहे. अध्यात्मातून मनाला शांतता, नैतिक बळ आणि सकारात्मक ऊर्जा मिळत असेल तर त्याचा स्वीकार करावा; मात्र चमत्कार, अघोरी उपाय, भीती, अंधानुकरण किंवा आर्थिक शोषणाला अध्यात्माचे स्वरूप देऊ नये. आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनात ध्यान, योग, प्रार्थना, वाचन, निसर्गस्नेह, समाजसेवा आणि कुटुंबासोबतचा वेळ यांसारख्या सकारात्मक मार्गांनी मानसिक समाधान मिळवता येते. त्याचबरोबर वैज्ञानिक उपचारांची गरज असल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणे आणि मानसिक तणाव अथवा अस्वस्थता असल्यास मानसोपचारतज्ज्ञ किंवा समुपदेशकांची मदत घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. श्रद्धा माणसाला उभारी देणारी असावी, भीती निर्माण करणारी नव्हे; अध्यात्म मनाला मुक्त करणारे असावे, परावलंबी बनविणारे नव्हे. त्यामुळे महिला असोत किंवा पुरुष, कोणत्याही साधू,

# सर्पदंश आता ‘अधिसूचित आजार’ घोषित

## साप चावल्यास लस, उपचार अन् मृत्यूची होणार नोंद



राज्यातील सर्पदंशांमुळे होणारे मृत्यू आणि अपंगत्व रोखण्यासाठी महाराष्ट्र सरकारच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने एक मोठा आणि अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यापुढे सर्पदंशाला ‘अधिसूचित आजार’ म्हणून घोषित करण्यात आले आहे. या निर्णयामुळे राज्यातील सर्व शासकीय, खासगी रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये आणि डॉक्टरांना सर्पदंशाच्या प्रत्येक संशयित, संभाव्य किंवा निश्चित घटनेची तसेच मृत्यूची नोंद आरोग्य प्राधिकरणाकडे करणे बंधनकारक असणार आहे.

या निर्णयामुळे सर्पदंशाच्या घटनांचे अचूक संनियंत्रण, रुग्णांवर वेळेत उपचार आणि सर्पविष प्रतिबंधक लस उपलब्धतेचे योग्य नियोजन करणे शक्य होणार असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. ग्रामीण आणि दुर्गम भागात सर्पदंशाचा धोका सर्वाधिक असतो, त्यामुळे वेळेत उपचार मिळणे अत्यंत गरजेचे असते.

शासनाच्या या नवीन अधिसूचनेनुसार, आरोग्य संस्था आणि डॉक्टरांना त्यांच्याकडे येणाऱ्या सर्पदंशाच्या प्रत्येक रुग्णाची माहिती संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी किंवा जिल्हा शल्यचिकित्सकांना कळवावी लागणार आहे. ही सर्व माहिती आरोग्य व्यवस्थापन माहिती प्रणाली किंवा एकात्मिक रोग सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत डिजिटल पद्धतीने नोंदवली जाईल. रुग्णाला देण्यात आलेल्या एएसव्ही कुप्यांची संख्या, उपचाराचा परिणाम आणि संदर्भित माहितीचा तपशीलही त्यात समाविष्ट असेल.

सर्पदंश प्रतिबंध व नियंत्रणासाठी विशेष प्रशासकीय रचना तयार करण्यात आली आहे. राज्यस्तरावर संचालक (रुग्णालये), जिल्हास्तरावर जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी तर महानगरपालिका क्षेत्रात वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांची ’नोडल अधिकारी’ म्हणून नियुक्ती केली जाणार आहे. हे अधिकारी संपूर्ण जिल्हयातील सर्पदंशाच्या घटनांवर आणि उपचारांच्या सुविधेवर थेट लक्ष ठेवतील.

उपचार करणाऱ्या प्रत्येक रुग्णालयाला सर्पविष प्रतिबंधक लस साठ्याची, त्याच्या वापराची आणि शिल्लक साठ्याची अद्ययावत नोंद ठेवावी लागेल. ज्या भागात सर्पदंशाच्या घटना जास्त घडतात, त्या भागात लसीचा तुटवडा भासू नये यासाठी या माहितीच्या आधारे लसींचा पुरवठा तात्काळ केला जाईल.

# श्रावणामुळे उपवासाचे पदार्थ महागले

नवी मुंबई : प्रतिनिधी

श्रावण महिन्यामुळे उपवासाच्या पदार्थांना मोठी मागणी वाढली असून, वाशी येथील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या धान्य बाजारात साबुदाणा, शेंगदाणा, भगर, वरई यांच्या खरेदीला वेग आला आहे. उपवासाच्या पदार्थांची मागणी वाढल्याने बाजारात या वस्तूंची उलाढालही वाढली आहे.

श्रावणात उपवास करणा-या नागरिकांकडून साबुदाणा, शेंगदाणा, भगर आणि अन्य उपवासाच्या पदार्थांना मोठी मागणी असते. त्यामुळे किरकोळ विक्रेत्यांकडून एपीएमसीमधील घाऊक बाजारातून मोठ्या प्रमाणात खरेदी केली जात आहे. सध्या शेंगदाण्याचे दर प्रकारानुसार ११५ ते १५० रुपये किलो, तर भगर २०० रुपयांच्या आसपास विकली जात आहेत.

सोमवारी एपीएमसी बाजारात साबुदाण्याची आवक ६८८ क्विंटल झाली असून, त्याचा घाऊक दर ६० ते ७१ रुपये किलो, सरासरी ६५.५० रुपये किलो होता. शेंगदाण्याची आवक ७२६ क्विंटल झाली असून, दर ८० ते १५० रुपये किलो, सरासरी १२० रुपये किलो



आहे.

श्रावणातील मागणी पुढील काही आठवडे कायम राहण्याची शक्यता असल्याने उपवासाच्या पदार्थांच्या बाजारपेठेत आणखी तेजी येण्याची शक्यता व्यापा-यांकडून व्यक्त केली जात आहे.

# बिहारमध्ये चेंगराचेंगरीत ९ ठार

## जलाभिषेकासाठी मंदिरात गर्दी, करंट पसरल्याची अफवा

लखीसराय : वृत्तसंस्था

बिहारमधील लखीसरायमध्ये मंदिरात झालेल्या भीषण चेंगराचेंगरीत ९ महिलांचा मृत्यू झाला. १२ हून अधिक लोक जखमी झाले. मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे. ही घटना अशोकधाम स्टेशन ते मंदिराकडे जाणा-या रस्त्यावर घडली. भाविकांच्या रांगेत एक खांब पडल्याने विद्युत प्रवाह पसरल्याची अफवा पसरली आणि एकच गोंधळ उडाला. त्यामुळे झालेल्या चेंगराचेंगरीत ९ भाविकांचा मृत्यू झाला.

लखीसरायचे जिल्हाधिकारी शैलेंद्र कुमार यांनी सांगितले की, पुरुषांच्या रांगेवर एक खांब पडला. त्यावेळी जिवंत वीजवाहिनी पडल्याची अफवा पसरली होती. पण प्रत्यक्षात



ती एक केबल (डिश/इंटरनेट केबल) होती. पुरुषांच्या गर्दीच्या दाबामुळे महिलांच्या रांगेवर दाब पडला, ज्यामुळे त्या एकमेकींवर पडल्या. मृत झालेल्या चौघींची ओळख पटली आहे. मधुबाला देवी, मनमाला देवी, हेमलता देवी आणि मुंगेर येथील रिंकू देवी अशी त्यांची नावे आहेत. या सर्व लखीसरायच्या रहिवासी होत्या. सीएम सम्राट चौधरी यांनी मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ४ लाख रुपयांची नुकसान भरपाई जाहीर केली.

दर्शनासाठी रांगेत उभ्या असलेल्या एका भाविकाने सांगितले की, तिथे प्रचंड गर्दी होती. तेव्हाच खांब पडल्याची आणि विजेचा धक्का लागल्याची बातमी पसरली. यानंतर लोकांमध्ये घबराट पसरली. लोक जीव वाचविण्यासाठी पळू लागले, तेव्हा बॅरिकेड्स तुटले आणि लोक एकमेकांवर पडू लागले. पोलिस आणि प्रशासन पहाटे ३ वाजल्यापासून घटनास्थळी उपस्थित होते. पण अफवा पसरताच अवघ्या २ मिनिटांत ही दुर्घटना घडली. बिहारमध्ये चेंगराचेंगरीची पाच महिन्यांतील ही दुसरी घटना आहे. या आधी ३१ मार्च रोजी नालंदा येथील मघरा शितला मंदिरात चेंगराचेंगरी झाली होती. त्यावेळी ८ महिलांचा मृत्यू झाला होता.

## कर्तृत्वाला सलाम! गुणवंतांचा सन्मान!

# कादरी फाउंडेशन राज्यस्तरीय गुणगौरव पुरस्कार २०२६ ;पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवा

बीड /प्रतिनिधी

समाजाच्या जडणघडणीत तसेच विविध क्षेत्रांत निःस्वार्थ भावनेने उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यासाठी कादरी फाउंडेशनच्या वतीने ‘राज्यस्तरीय गौरव पुरस्कार २०२६’ आयोजित करण्यात आला आहे. या पुरस्कारासाठी पात्र व इच्छुक व्यक्तींनी आपले प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन निवड समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

कादरी फाउंडेशन न्ड चॅरिटेबल ट्रस्ट, बीड यांच्या वतीने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या सन्मानासाठी ‘राज्यस्तरीय गौरव पुरस्कार २०२६’ आयोजित करण्यात आला आहे. या पुरस्कारासाठी इच्छुकांकडून २० ते ३० ऑगस्ट २०२६ या कालावधीत प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.



समाजसेवा, शिक्षण, उद्योग, वैद्यकीय क्षेत्र, प्रशासकीय सेवा, क्रीडा, कला-संस्कृती, पत्रकारिता तसेच इतर सामाजिक व सार्वजनिक क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींची पुरस्कारासाठी निवड करण्यात येणार आहे. समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या योगदानाची दखल घेऊन त्यांचा गौरव व सन्मान करणे हा पुरस्काराचा मुख्य उद्देश आहे.इच्छुक उमेदवारांनी आपला सविस्तर परिचय, कार्याचा तपशील तसेच संबंधित कागदपत्रांसह प्रस्ताव कादरी फाउंडेशन कार्यालय, जुना बाजार, बीड येथे सादर करावा. प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख ३० ऑगस्ट २०२६ आहे.अधिक माहितीसाठी उपसंपादक जैद कादरी( ८१८०८४८२८१) या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन निवड समिती वतीने करण्यात आले आहे.पुरस्कार निवड समितीमध्ये प्रामुख्याने रेहान शेख (सत्यवादी संपादक) (९४२०२५३०३८), जफर खान सर (९४०४८८३५२४) अब्दुल रहेमान संपादक ९३५९९६७३९५, हकीम मनियार सर(९४२०६५८६७६) ,शेख मसरूर अनवर क्रीडा शिक्षक (९८२२२ ४४४०२) उपसंपादक जैद कादरी (८१८०८४८२८१) ,मुशीर इनामदार (९२६०६१६६२८), शेख वसिम (९०२८९७९९९१) मोहसीन बेग सर( ९९७०८१८८०६) ,मुशहेद सर यांचा समावेश आहे.

# मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना समितीच्या सदस्यपदी संदीप देशमुख यांची निवड

शेवगाव :- जयप्रकाश बागडे

शेवगाव-पाथर्डी विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मोनिकाताई राजळे यांचे खंदे समर्थक शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी गावचे संदीप देशमुख यांची मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेच्या समितीवर सदस्यपदी निवड झाली आहे. या निवडीमुळे देशमुख यांच्या समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, विविध स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

संदीप देशमुख हे आमदार मोनिकाताई राजळे यांचे विश्वासू व खंदे समर्थक म्हणून मतदारसंघात परिचित आहेत. सामाजिक तसेच विविध सार्वजनिक प्रश्नांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. त्यांच्या या निवडीमुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांना समितीच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडण्याची संधी मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.



मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना शेतापर्यंत जाण्यासाठी सुयोग्य रस्ते उपलब्ध करून देणे, पाणंद रस्त्यांची कामे मार्गी लावणे तसेच ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्था मजबूत करण्यावर भर दिला जात आहे.

संदीप देशमुख यांची समितीवर झालेली निवड ही शेवगाव-पाथर्डी मतदारसंघासाठी महत्त्वाची मानली जात असून, त्यांच्या माध्यमातून शेत पाणंद रस्त्यांसह शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांना अधिक प्रभावीपणे वाचा फुटेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

या निवडीबद्दल आमदार मोनिकाताई राजळे , तंटामुक्ती अध्यक्ष कासम भाई शेख , माजी उपसरपंच अशोकराव खिळे ,ज्येष्ठ कार्यकर्ते रतनभाऊ देशमुख , पत्रकार जयप्रकाश बागडे , पत्रकार पांडुरंग निंबाळकर , भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी व ग्रामस्थांनी देशमुख यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# जनसेवा व्यसनमुक्ती केंद्र घाटसावळी येथे नशामुक्त भारत अभियान शपथ

## युवा शक्ती ही राष्ट्र शक्ती - तत्वशिल कांबळे

बीड (प्रतिनिधी)

दि १८ ऑगस्ट रोजी श्री विठ्ठल रुक्मिणी सेवाभावी संस्था घाटसावळी संचलित जनसेवा व्यसनमुक्ती केंद्र घाटसावळी येथे जिल्हा प्रशासन, समाज कल्याण विभाग जिल्हा पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने नशा मुक्त भारत अभियान कार्यक्रम अंतर्गत नशा मुक्त भारत विकसित भारत अंतर्गत व्यसनमुक्ती विरोधी शपथ घेण्यात आली.जिल्हाधिकारी या.विवेक जॉन्सन यांच्या व बीड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष शिवाजीराव फड यांच्या मार्गदर्शनाखाली व व संस्थाचे मार्गदर्शक चंद्रकांत फड व कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नितीन भैया फड यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमासाठी भारत सरकार च्या




नशा मुक्त भारत अभियान समीतीचे सदस्य तत्वशिल कांबळे, व प्रा आजिनाथ शेरकर, अमोल नेहरकर व कौटुंबिक सल्लागार तथा समुपदेशक वर्षा शेरकर हे उपस्थित होते.कार्यक्रमात या वेळी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला व सामुहिक शपथ घेण्यात आली पुढे कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते तत्वशिल कांबळे म्हणाले युवा शक्ती ही राष्ट्र शक्ती आहे युवकांनी व्यसनापासून दूर राहिले पाहिजे कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गिताराम गायकवाड, रामनाथ मुळे, गोरख फड, सहदेव फड सचिन दराडे, संकेत दराडे यांनी परीश्रम घेतले व शेवटी राष्ट्रगान

# मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती पुन्हा खालावली

## अंतरवाली सराटीत उपचार सुरू

बीड ।प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी लढा देणारे आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती मंगळवारी अचानक पुन्हा खालावली आहे. अंतरवाली सराटी येथील सरपंचाच्या मळ्यात त्यांच्यावर सध्या वैद्यकीय पथकाकडून उपचार सुरू असून, त्यांना सलाईन लावण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी प्रकृतीच्या तक्रारींमुळे मनोज जरांगे पाटील यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिथे उपचार घेतल्यानंतर त्यांनी नुकताच डिस्चार्ज घेतला होता आणि ते अंतरवाली सराटी



येथे परतले होते. मात्र, गावात परतल्यानंतर त्यांची प्रकृती पुन्हा बिघडल्याने वैद्यकीय पथकाला पाचारण करण्यात आले. सध्या डॉक्टरांच्या थेट देखरेखीखाली सरपंचाच्या मळ्यात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. जरांगे पाटील यांच्या प्रकृतीबाबत अद्याप कोणतेही अधिकृत वैद्यकीय बुलेटीन किंवा माहिती समोर आलेली नाही. परंतु, डॉक्टरांचे पथक त्यांच्या प्रकृतीवर सतत बारीक लक्ष ठेवून आहे. मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालावल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरताच अंतरवाली सराटी येथील आंदोलनस्थळी उपस्थित असलेल्या हजारो कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि समर्थकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. उपचाराच्या ठिकाणी समर्थकांनी मोठी गर्दी केली असून, सर्वजण त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी यासाठी प्रार्थना करत आहेत.

# स्वतंत्र दिनीच देशभक्तीचा अपमान !

## ’ ऐ वतन तेरे लिए ’ ऐवजी ऐ सनम ’ म्हणणाऱ्या मुख्यमंत्री नी माफी मागावी :- शेख युनूस

बीड (प्रतिनिधी)

स्वतंत्र दिनासारख्या पवित्र दिवशी राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणीस साहेब यांनी देशभक्तीचा घोर अपमान केलेला आहे, त्यांनी राज्याची आणि देशाची माफी मागावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता त्याचा पत्रकार शेख युनूस यांनी केली.



पुढे ते म्हणाले की, १५ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या शासकीय कार्यक्रमात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस साहेब यांनी शहिदांना समर्पित असलेले ’ ऐ वतन तेरे लिए ’ हे देशभक्ती पर गीत म्हणताना ते ’ ए सनम तेरे लिये ’ असे म्हणाले. या वक्तव्यावर त्यांनी खुलासा करावा,आणि संपूर्ण देशाची माफी मागावी.

हा शब्दाचा घोळ नाही, हा देशद्रोह आहे.

जेव्हा संपूर्ण देशातील प्रत्येक भारतीय ’ ऐ वतन तेरे लिए ...हर करम अपना करेंगे ’ म्हणत सैनिकाच्या बलिदानांला सलाम करत होता, तेव्हा सर्वोच्च पदावर असलेल्या व्यक्तीच्या तोंडून सनम हा शब्द निघणे म्हणजे, हा केवळ बोलण्यातील घोळ नाही. हा देशाच्या अस्मितेशी, तिरंग्याशी आणि सीमेवर प्राण अर्पण करणाऱ्या जवानाशी केलेला घात आहे , शहिदाच्या रक्ताचा अपमान आहे, याला महाराष्ट्राची जनता कदापि खपवून घेणार नाही. मुख्यमंत्र्यांनी तात्काळ महाराष्ट्रातील जनतेची आणि शहिदाच्या कुटुंबियाची जाहीर माफी मागावी. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता तथा पत्रकार शेख युनूस यांनी केली.

# आमदार संग्राम जगताप यांच्यासह १५० जणांवर गुन्हा दाखल


अहिल्यानगर। प्रशांत बाफना

कर्जत तालुक्यातील चिंचोली काळदात फाटा चौक येथे जमावबंदी आदेशाचा भंग करून रस्ता रोको केल्याप्रकरणी मिरजगाव पोलीस ठाण्यात आमदार संग्राम जगताप यांच्यासह अनेक प्रमुख कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक १७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेदरम्यान चिंचोली काळदात फाटा चौक येथे हे आंदोलन झाले. जिल्हादंडाधिकाऱ्यांच्या मनाई आदेशाचा भंग करून श्रीगोंदा ते जामखेड आणि कर्जत ते मिरजगाव रस्त्यावरील वाहतूक अडवण्यात आली होती. यामुळे प्रवाशांची अडचण झाली. या प्रकरणी पोलीस कर्मचारी बळीराम गोपीनाथ काकडे यांनी मिरजगाव पोलीस ठाण्यात सरकारतर्फे फिर्याद दिली आहे.

त्यांच्या फिर्यादीवरून आमदार संग्राम जगताप, धवलसिंह मोहिते, ड. आकाश हाळनवर, शुभम माने, चंदनसिंग परदेशी, नितीन तोरडमल, वैभव काळदाते, सावन शेटे, उदयसिंग परदेशी, दीपक गागर्डे, विठ्ठलसिंह शेडगे, रघुआबा काळदाते, धनंजय बांदल, बाळासाहेब निंबोरे, राहुल मते, प्रसाद कानगुडे, बालाजी लाळगे, सुनील यादव, ऋषीकेश काळदाते यांच्यासह इतर १०० ते १५० जणांवर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर, पोलीस निरीक्षक हनुमंत गायकवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक झंझाड यांनी घटनास्थळी भेट दिली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक किरण जगदाळे करत आहेत

# पुणे ते छत्रपती संभाजीनगर प्रवास अवघ्या २ तासांत!



पुणे : प्रतिनिधी

पुणे ते छत्रपती संभाजीनगर हा प्रवास अवघ्या दोन तासांत पूर्ण व्हावा, हे माझे स्वप्न असून त्यासाठी शानदार महामार्ग विकसित केला जात आहे, अशी घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली. या सहापदरी महामार्गामुळे पुणे ते छत्रपती संभाजीनगर आणि तिथून पुढे नागपूरपर्यंतचा प्रवास अत्यंत जलद आणि सुलभ होणार असून त्यासाठी विमानाची गरज नसेल, असेही गडकरी म्हणाले.

यासोबतच मुंबई ते बंगळुरू हा प्रवास ५ तासात होणार आहे. त्यामुळे या मार्गावरून जलद प्रवास अधिक सुलभ होणार आहे. त्या पद्धतीचे रस्ते तयार करण्यात येत आहेत, असेही गडकरी यांनी सांगितले. पुण्यात आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. पुण्यात सध्या वाहतूक कोंडी आणि प्रदूषणाची मोठी समस्या निर्माण झाली आहे. यावर मात करण्यासाठी येत्या दोन वर्षांत पुणे आणि आसपासच्या परिसरासाठी तब्बल ६० हजार कोटी रुपयांच्या विविध रस्ते प्रकल्पांची कामे केली जाणार आहेत. यामध्ये ३१ हजार ६०० कोटी रुपयांच्या शिरूर ते पुणे प्रकल्पाचाही समावेश आहे.

गडकरी यांनी पुण्यातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांची माहिती दिली. हडपसर-यावत मार्गासाठी ५,२६५ कोटी रुपये, तळेगाव-चाकण-शिक्रापूर या ५३ किमीच्या टप्प्यासाठी ४ हजार कोटी रुपये तर शिरूर ते संभाजीनगर १९२ किमी मार्गासाठी १५ हजार कोटी रुपये मंजूर करण्यात आले. याशिवाय खेड ते नाशिक फाटा ३० किमीसाठी ८ हजार कोटी, रावेत ते न-हे ६ हजार कोटी आणि पुणे ते सोलापूर मार्गासाठी ८ हजार कोटी रुपयांचा निधी देण्यात आला.

रस्ते जाळ्याच्या विस्ताराबाबत बोलताना गडकरी म्हणाले की, अटल सेतू ते पागोटे चौक आणि तिथून पुढे पुण्यापर्यंत एक नवीन रस्ता विकसित केला जात आहे. या मार्गावरून पुढे बंगळुरूपर्यंत अवघ्या ५ तासांत पोहोचता येईल, अशी व्यवस्था उभारली जात आहे. तसेच शिळफाटा ते पनवेल आणि जुन्या पुणे-मुंबई हायवेच्या सुधारणेवर लक्ष केंद्रित करण्यात आले असून त्यासाठी ६० हजार कोटी रुपये मंजूर करण्यात आले.

# बीड जिल्ह्यातील ६५ शाळांमध्ये एकच शिक्षक, विद्यार्थ्यांचे नुकसान

## सरकारचे धोरण हेच विद्यार्थ्यांचे मरण म्हणत कचेरी समोर निदर्शने



बीड /प्रतिनिधी

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी होऊनही गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रातील ८५० सरकारी शाळा बंद पडल्याचा मुद्दा उपस्थित करत कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याच्या शासनाच्या निर्णयाविरोधात सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली. यावेळी बीड जिल्ह्यातील ६५ शाळेत एकच शिक्षक असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीवर सरकारचे शैक्षणिक धोरण हेच विद्यार्थ्यांचे मरण असल्याच्या घोषणा देण्यात आल्या.

जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री, पालकमंत्री तसेच शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. जिल्ह्यातील ६५ शाळांमध्ये मंजूर दोन पदे असतानाही केवळ एकच शिक्षक कार्यरत असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. आंदोलनात शेख युनूस, मुबीन शेख, माजी सैनिक अशोक येडे, किष्किंधा पांचाळ, नितीन सोनवणे, भीमराव कुटे, हनुमान घोडके, अँड. प्राचार्य राजकुमार कदम आदी उपस्थित होते.

# मी खमकी, दोन-चार जणांना रिटायर करूनच रिटायर होणार- पंकजा मुंडे



बीड / प्रतिनिधी

बीड भाजप नेत्या आणि मंत्री पंकजा मुंडे यांनी केजमधील एका कार्यक्रमात रिटायरमेंट संदर्भातील जुन्या वक्तव्यावर आणि त्यानंतर प्रसिद्ध झालेल्या बातमीवर स्पष्टीकरण दिलं आहे. मुंडे म्हणाल्या, कोणीतरी बातमी दिलेली, ताई रिटायर होणार. मी काही रिटायर होत नाही. चांगली खमकी आहे. दोन-चार लोकांना रिटायर केल्यानंतर आपण रिटायर व्हायचं. आधी नाही, असं पंकजा मुंडे म्हणाल्या. बीड-परळी महामार्गावरून प्रवास करताना तोच रस्ता, तीच माणसं पाहून रिटायरमेंट घ्यावीशी वाटते, असं काही दिवसांपूर्वी मंत्री पंकजा मुंडे यांनी म्हटलं होतं. त्यांच्या या विधानाची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा झाली. मात्र आता केजमधील एका कार्यक्रमात पंकजा मुंडेंनी आपल्या रिटायरमेंटच्या चर्चेवर थेट भाष्य केलंय. माध्यमांनी 'ताई रिटायर्ड होणार' अशा बातम्या केल्या. पण मी रिटायर्ड होणार नाही. मी चांगली खमकी आहे, असं त्या म्हणाल्या. इतकंच नाही तर, 'रिटायर्ड कशामुळे व्हायचं? दोन-चार लोकांना रिटायर्ड केल्यानंतर आपण रिटायर्ड व्हायचं,' असं विधानही त्यांनी केलं. आपल्याला लोकांची सेवा करण्यात कमी पडायला नाही पाहिजे, ही भावना असते, असं पंकजा मुंडे यांनी म्हटलं. मुंडे साहेबांनी खूप कष्ट काढले. देवाने सुखाने खाऊ दिलं नाही. ते पाच वर्षं जगले असते तर तुमच्यासाठीच जगले असते, हा मला विश्वास आहे, असं पंकजा मुंडे म्हणाल्या.

# उड्डाणापूर्वीच विमानात तांत्रिक बिघाड

नांदेड : प्रतिनिधी

नांदेडहून गाझियाबादकडे जाणा-या स्टार एअरच्या विमानात मंगळवारी सकाळी उड्डाणापूर्वीच तांत्रिक बिघाड आढळून आल्याने प्रवाशांची चांगलीच धाकधूक उडाली. विमानातील बिघाड लक्षात येताच विमानात बसलेल्या प्रवाशांना तातडीने खाली उतरविण्यात आले. तब्बल तीन तासांच्या प्रयत्नांनंतर तांत्रिक बिघाड दूर करण्यात आला आणि त्यानंतर विमानाने गाझियाबादच्या दिशेने उड्डाण केले.

मंगळवारी १८ ऑगस्ट रोजी सकाळी स्टार एअरचे विमान बंगळुरूहून नांदेड विमानतळावर दाखल झाले. त्यानंतर याच विमानाने नांदेडहून गाझियाबादच्या हिंडन विमानतळाकडे जाण्याचे नियोजन होते. विमान (क्रमांक एस ५- १८७) ही नांदेड-गाझियाबाद मार्गावरील नियमित सेवा आहे. उपलब्ध विमान वेळापत्रकानुसार नांदेडहून हिंडनकडे दररोज थेट विमानसेवा उपलब्ध असून या मार्गाचे अंतर सुमारे १,०६० किलोमीटर आहे. उड्डाणाचा नियोजित कालावधी साधारण एक तास ५० मिनिटांचा आहे.

मंगळवारी १८ ऑगस्ट रोजी सकाळी विमान नांदेड विमानतळावर आल्यानंतर गाझियाबादला जाणारे प्रवासी विमानात दाखल झाले होते. उड्डाणाची तयारी सुरू असतानाच विमानात तांत्रिक बिघाड असल्याचे पायलटच्या निदर्शनास आले. सुरक्षेच्या दृष्टीने कोणताही धोका पत्करू नये म्हणून विमानातील सर्व प्रवाशांना खाली उतरविण्यात आले. त्यामुळे विमानतळावर काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. विमान उड्डाण घेण्यापूर्वीच तांत्रिक बिघाड झाल्याचे समोर आल्याने प्रवाशांमध्ये चिंता निर्माण झाली. विमानसेवा खोळंबल्याने प्रवाशांना विमानतळावरच प्रतीक्षा करावी लागली. नियोजित वेळेत विमान रवाना न झाल्याने काही प्रवाशांनी विमानसेवेच्या विलंबाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

तीन तासांच्या प्रयत्नानंतर बिघाड दूर

विमानातील तांत्रिक बिघाड दूर करण्यासाठी तांत्रिक कर्मचा-यांकडून प्रयत्न सुरू करण्यात आले. जवळपास ३ तासांच्या प्रयत्नानंतर विमानातील बिघाड दुरुस्त करण्यात आला. आवश्यक तांत्रिक तपासणी पूर्ण झाल्यानंतर विमान उड्डाणासाठी सज्ज करण्यात आले. त्यानंतर प्रवाशांना पुन्हा विमानात बसविण्यात आले आणि विमानाने गाझियाबादच्या हिंडन विमानतळाच्या दिशेने उड्डाण केले.




# श्रावण सोमवार : श्रद्धा, उपवास आणि शिवभक्तीचा अद्भुत संगम

श्रावण आला की निसर्ग हिरवा शालू नेसतो , आकाश ढगांची दुलई पांघरते , रानावनात पावसाच्या सरींचे संगीत घुमते आणि मंदिरांच्या गाभाऱ्यातून 'ॐ नमः शिवाय'चा नाद वातावरणात दरवळू लागतो . भारतीय संस्कृतीत श्रावण महिना हा श्रद्धा , साधना , संयम आणि निसर्गाशी एकरूप होण्याचा काळ मानला जातो . त्यातही श्रावणातील सोमवाराला भगवान शिवाच्या उपासनेत विशेष महत्त्व आहे . सोमवार हा शिवपूजेसाठी पवित्र मानला जातो आणि श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवार भक्तांसाठी श्रद्धेचा उत्सव बनतो . शिवलिंगावर जलाभिषेक , दुग्धाभिषेक , बेलपत्र , धतुरा , फुले अर्पण करून 'हर हर महादेव'चा जयघोष केला जातो . श्रावणातील सोमवारच्या व्रतामागे केवळ धार्मिक श्रद्धा नाही , तर मनावर संयम ठेवणे , सात्त्विक आहार घेणे , ध्यान करणे आणि आत्मचिंतन करण्याची सुंदर जीवनपद्धतीही दडलेली आहे . श्रावण माहात्म्यात सोमवार हा शिवपूजेचा दिवस म्हणून विशेषत्वाने वर्णिला आहे .

श्रावण सोमवारच्या उपवासाला महाराष्ट्रात विशेष सांस्कृतिक स्थान आहे . अनेक स्त्री - पुरुष श्रद्धेने उपवास करतात ; काही जण निर्जळी किंवा फलाहार करतात , तर काही जण उपवासाचे सात्त्विक पदार्थ ग्रहण करतात . मात्र उपवास म्हणजे केवळ अन्नत्याग नव्हे , तर मनातील विकारांचा त्याग अशी त्याची व्यापक संकल्पना आहे . राग कमी करणे , संयम वाढवणे , गरजूंची सेवा करणे , प्रार्थना आणि ध्यानाला वेळ देणे , हीदेखील उपवासाचीच खरी साधना आहे . शिवपूजेत जलाला विशेष महत्त्व आहे . 'ॐ नमः शिवाय' या पंचाक्षरी मंत्राचा जप करत शिवलिंगावर पाणी अर्पण केले जाते . बेलपत्र अर्पण करताना भक्त मनोभावे प्रार्थना करतात . शिवपूजेच्या विविध परंपरांमध्ये पाणी , दूध , मध , दही , तूप , बेलपत्र , फुले आणि धूप यांचा वापर केला जातो . महाराष्ट्र पर्यटन विभागाच्या माहितीनुसार शिवपूजा , अभिषेक , उपवास , ध्यान आणि मंत्रजप या परंपरा शिवभक्तीतील महत्त्वाचे घटक आहेत .

श्रावण सोमवारामागील धार्मिक इतिहास आणि पौराणिक परंपरा अत्यंत समृद्ध आहे . समुद्रमंथनातून निर्माण झालेल्या हलाहल विषामुळे सृष्टी संकटात सापडली , तेव्हा भगवान शिवाने ते विष आपल्या कंठात धारण करून सृष्टीचे रक्षण केले , अशी पुराणपरंपरेतील कथा आहे . त्यामुळे ते 'नीलकंठ' म्हणून पूजले जातात . शिव म्हणजे संहार नव्हे , तर परिवर्तनाचे प्रतीक आहे ; जुन्याचा त्याग करून नव्याला जन्म देणारी शक्ती म्हणजे शिवतत्त्व . कैलासावर ध्यानस्थ असलेला शिव आपल्याला अंतर्मुख होण्याचा संदेश देतो , तर गळ्यातील नाग , अंगावरील भस्म , जटांमधून वाहणारी गंगा आणि मस्तकावरील चंद्र निसर्गाशी असलेले त्यांचे अतूट नाते सांगतात . म्हणूनच श्रावणातील शिवोपासना ही केवळ मंदिरातील पूजा नसून निसर्ग , संयम आणि आत्मशुद्धी यांचा सुंदर संगम आहे . 'ॐ त्र्यम्बकं यजामहे सुगन्धिं पुष्टिवर्धनम् । उर्वारुकमिव बन्धनान् मृत्योर्मुक्षीय मामृतात् ।।' हा महामृत्युंजय मंत्र शिवभक्तांच्या श्रद्धेत विशेष स्थान राखतो . 'ॐ नमः शिवाय'चा अखंड जप मनाला स्थैर्य देतो आणि भक्तीला अंतर्मुखतेची दिशा देतो .



भारताच्या कानाकोपऱ्यात श्रावणातील शिवभक्तीचे असंख्य रंग पाहायला मिळतात . काशी विश्वनाथ , सोमनाथ , महाकालेश्वर , ओंकारेश्वर , केदारनाथ , त्र्यंबकेश्वर , घृष्णेश्वर , भीमाशंकर , वैद्यनाथ आणि रामेश्वर या ज्योतिर्लिंग क्षेत्रांत श्रावण काळात विशेष धार्मिक वातावरण असते . महाराष्ट्रात त्र्यंबकेश्वर , भीमाशंकर , घृष्णेश्वर , औंढा नागनाथ आणि बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ ही शिवभक्तीची महत्त्वाची केंद्रे आहेत . परळी वैजनाथ हे बीड जिल्ह्याच्या भूमीत वसलेले ज्योतिर्लिंग क्षेत्र असून श्रावण महिन्यात येथे विशेष भक्तिभावाचे वातावरण असते . औंढा नागनाथ येथेही श्रावणात भाविक अभिषेक आणि पूजेसाठी मोठ्या संख्येने येतात . त्र्यंबकेश्वरला श्रावण , नागपंचमी आणि इतर धार्मिक पर्वांमध्ये विशेष महत्त्व आहे . घृष्णेश्वरच्या गाभाऱ्यात बेलपत्र , दूध आणि फुले अर्पण करताना भक्तांच्या मुखातून मंत्रोच्चार घुमतात . या मंदिरांची परंपरा केवळ धार्मिक नाही ; ती महाराष्ट्राच्या सांस्कृतिक स्मृतीचा आणि स्थापत्य वारशाचा अविभाज्य भाग आहे .

श्रावण सोमवाराच्या निमित्ताने मंदिरांमध्ये पहाटेपासूनच पूजा - अर्चना सुरू होते . काकड आरती , अभिषेक , रुद्राभिषेक , लघुरुद्र , महामृत्युंजय जप , शिवमहिम्न स्तोत्र , आरती आणि भजनांनी मंदिर परिसर भक्तिमय होतो . कुठे फुलांची आकर्षक सजावट असते , कुठे रांगोळ्यांनी मंदिराचा प्रांगण उजळतो , तर कुठे हजारो दिव्यांच्या प्रकाशात शिवलिंगाचे दर्शन घेताना भक्तांच्या डोळ्यांत श्रद्धेचे अश्रू तरळतात . 'हर हर महादेव'चा जयघोष आणि घंटानाद यामुळे वातावरणातील प्रत्येक कण जणू शिवमय होऊन जातो . श्रावणातील भक्तीची ही परंपरा भारतापुरती मर्यादित नसून जगभरातील भारतीय समुदायही विविध देशांमध्ये शिवमंदिरांमध्ये श्रावण सोमवार , अभिषेक , भजन आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करतात . दूरदेशी राहूनही मातृभूमीतील देव , भाषा , संस्कृती आणि परंपरांशी नाते जपण्याचा हा सुंदर प्रयत्न आहे . म्हणूनच श्रावण सोमवार हा केवळ धार्मिक दिवस नसून भारतीय सांस्कृतिक ओळखीला जगभर जोडणारा भावनिक सेतू आहे . श्रावण सोमवार आपल्याला निसर्गसंवर्धनाचाही संदेश देतो . शिवाच्या पूजेत बेलपत्र , जल आणि निसर्गातील विविध घटकांना स्थान आहे . म्हणून श्रद्धेच्या नावाखाली निसर्गाची हानी न करता पर्यावरणपूरक पूजा करण्याची आज गरज आहे . मंदिरांमध्ये प्लास्टिकचा वापर कमी करणे , पाण्याची नासाडी टाळणे , निर्माल्याचे योग्य व्यवस्थापन करणे , वृक्षारोपण करणे आणि नदी - तलाव स्वच्छ ठेवणे हीच आधुनिक काळातील शिवभक्ती ठरू शकते . बीडसारख्या मराठवाड्यात पाणी ही जीवनाची सर्वांत मोठी गरज आहे . त्यामुळे 'जल हीच शिवपूजा' असा संदेश घेऊन श्रावण सोमवारला जलसंवर्धनाची शपथ घेणे अधिक अर्थपूर्ण ठरेल . एका बाजूला मंदिरात शिवलिंगावर पाण्याचा अभिषेक आणि दुसऱ्या बाजूला गावातील जलस्रोत कोरडे , अशी विसंगती राहू नये . शिव म्हणजे कल्याण , म्हणून समाजाचे आणि निसर्गाचे कल्याण करणारी प्रत्येक कृती हीच खरी शिवसेवा आहे .

श्रावण सोमवारच्या या पवित्र वातावरणात मनात एकच भावना जागी होते - 'करचरण कृतं वाक्कायजं कर्मजं वा , श्रवणनयनजं वा मानसं वापराधम् । विहितमविहितं वा सर्वमेतत्क्षमस्व , जय जय करुणाब्धे श्रीमहादेव शम्भो ।।' शिवभक्ती म्हणजे मनातील अहंकार वितळवणे , दुःखात धीर देणे , संकटात संयम ठेवणे आणि दुसऱ्याच्या जीवनात प्रकाश निर्माण करणे . म्हणूनच श्रावण सोमवार हा उपवासाचा दिवस जितका आहे , तितकाच तो आत्मपरीक्षणाचा दिवस आहे . पावसाच्या सरींनी धरणी हिरवीगार होते , तसेच शिवनामाच्या सरींनी मनातील कोरडेपणा दूर व्हावा , अशी प्रार्थना या दिवशी प्रत्येक भक्ताच्या मनात असते . 'शिव शंकर भोलेनाथ , हर हर महादेव'च्या जयघोषात भक्तीचा स्वर उमटतो आणि अंतर्मनातून जणू एकच कविता जन्म घेते - 'धारा पडती नभातून , अभिषेक होई शंकराला ; बेलफुलांच्या सुगंधातून , भक्ती वाहे महादेवाला . श्रावणाच्या हिरव्या वाटेवर , नाम तुझे ओठी राहो ; दुःखाच्या काळोखामध्ये , शिवकृपेचा दीप उजळो .' हा दीप प्रत्येक घरात , प्रत्येक मनात आणि प्रत्येक गावात तेवत राहो , हीच श्रावण सोमवारच्या पवित्र पर्वाची मंगल कामना . हर हर महादेव !

**-चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
तहसीलदार , बीड

# पावसाची सरासरी केवळ ४८ टक्के;जिल्ह्यात ५० टँकरद्वारे पाणीपुरवठा

बीड / प्रतिनिधी

यंदाच्या पावसाळ्यात बीड जिल्ह्यावर वरुणराजाने अवकृपा केल्याचे चित्र आहे. ऑगस्ट महिन्याचा पंधरवडा उलटून गेला असला तरी, जिल्ह्याने अद्याप पावसाचा ५० टक्क्यांचा टप्पाही गाठलेला नाही. परिणामी, जिल्ह्याच्या शहरी व ग्रामीण भागात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून, सध्या १८ गावे आणि २३ वाड्यांची तहान ५० टँकरद्वारे भागवली जात आहे. पावसाळा संपत आला तरी विहिरी आणि नद्या कोरड्याच असल्याने बळीराजासह नागरिक मोठ्या चिंतेत आहेत.

जिल्ह्याचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान ५६६ मिमी इतके आहे. मात्र, १ जून ते १६ ऑगस्ट या कालावधीत जिल्ह्यात केवळ २७४ मिमी पावसाची नोंद झाली आहे. हे प्रमाण एकूण सरासरीच्या केवळ ४८ टक्के इतकेच आहे. प्रशासनाने पाणीटंचाईवर मात करण्यासाठी तातडीने पावले उचलली असून, पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी युद्धपातळीवर नियोजन केले आहे. शहरी भागात एकूण २४ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. यामध्ये पाटोदा शहरात १० तर आष्टीमध्ये १४ टँकरचा समावेश आहे. बीड जिल्ह्याचा भौगोलिक इतिहास पाहता, येथे परतीच्या पावसाचे प्रमाण नेहमीच लक्षणीय असते. आता पावसाळ्याचा शेवटचा टप्पा सुरू झाला असून, ऑगस्टच्या अखेरीस आणि सप्टेंबर महिन्यात दमदार पाऊस होईल, अशी भाबडी आशा शेतकरी आणि नागरिक बाळगून आहेत.



विशेषतः अत्यंत कमी पाऊस झालेल्या गेवराई, आष्टी आणि वडवणी या तालुक्यांमध्ये करपणाऱ्या खरीप पिकांना जीवदान मिळण्यासाठी तात्काळ जोरदार पावसाची आवश्यकता आहे. आगामी काळात बीडकरांना टंचाई आणि भीषण दुष्काळाला सामोरे जावे लागण्याची दाट शक्यता आहे. जिल्ह्यातील पावसाच्या आकडेवारीचे विश्लेषण केल्यास पावसाच्या विषम वितरणाचे स्पष्ट चित्र दिसून येते, जिल्ह्यात सर्वाधिक म्हणजेच ४१४.६ मिमी (७१.० टक्के) पाऊस झालेला केज तालुका आघाडीवर आहे, तर त्याखालोखाल पाटोदा (२८८.४ मिमी, ५३.५ टक्के), परळी वैजनाथ (३२३.९ मिमी, ५१.६ टक्के) आणि धारूर (३४२.४ मिमी, ५१.१ टक्के) या तालुक्यांनीही पन्नास टक्क्यांचा टप्पा ओलांडून मोठा दिलासा दिला आहे. दुसऱ्या गटात ४० ते ५० टक्क्यांच्या दरम्यान पाऊस झालेल्या मध्यम स्थितीतील तालुक्यांचा समावेश होतो; ज्यामध्ये माजलगाव (२७८.९ मिमी, ४५.२ टक्के), शिरूर कासार (२३२.२ मिमी, ४५.० टक्के), बीड (२६१.१ मिमी, ४३.९ टक्के) आणि अंबाजोगाई (२७६.८ मिमी, ४३.८ टक्के) या तालुक्यांनी सरासरीच्या जवळपास निम्म्यापर्यंत मजल मारली आहे.या तीन तालुक्यांत टंचाई : वडवणी, आष्टी व गेवराई या तीन तालुक्यातील ४० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस नोंदवला गेला आहे. वडवणी (२३५.४ मिमी, ३९.२ टक्के) आणि आष्टी (२०९.० मिमी, ३८.३ टक्के) यांच्या पाठोपाठ जिल्ह्यात सर्वात कमी म्हणजे केवळ २१२.५ मिमी (३६.२ टक्के) गेवराई तालुक्यात झाला आहे,